काबरा एक्सप्रेस
डेली A/C बस / अर्जंट पार्सल सर्विस • फुल लोड / पार्ट लोड सर्विस उपलब्ध
गुजरात: अहमदाबाद, सुरत, अंकलेश्वर, राजकोट, बडौदा, किम, आनंद,नवसारी, वलसाड, वापी, भरुच, जामनगर
मध्यप्रदेश: इंदौर, (राज महौल्ला, तीन इमली) उज्जैन
महाराष्ट्र: मुंबई, (वसई, बोरीवली, अंधेरी, भिवंडी, वाशी) औरंगाबाद, नाशिक, पुणे
राजस्थान: उदयपुर, अजमेर, जयपुर दिल्ली मोरी गेट
साऊथ: बंगलोर, हैदराबाद, गोवा
अहमदनगर नेवासकर पेट्रोल पंपासमोर, मार्केटयार्ड चौक, स्टेशन रोड
7972872112
EYE Q MEDIA





# नवा मराठा


संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर,बुधवार दि. २५.१२.२०२४ | अंक नं. २४९ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020




जगप्रसिद्ध नामांकित ब्रॅण्डचे दर्जेदार होम अप्लायसेंस एकाच छता खाली...
• फ्रीज • ए.सी. • वॉशिंग मशिन
• एलईडी टीव्ही • होमथिएटर
• मोबाईल • होम अप्लायन्सेस
सुलभ हप्त्यावर उपलब्ध 0% फायनान्स
COMPRO Systems & Services
HDB FINANCIAL SERVICES · BAJAJ FINSERV
अंबर प्लाझा, एचडीएफसी बँके जवळ, स्टेशनरोड, अ.नगर. मो. ९३२५१०३०५०
PHILIPS | LG | Whirlpool | SONY | SAMSUNG | KENSTAR | JVC | Electrolux

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090


# शासकीय आधार केंद्र खासगी कंपनीच्या घशात घालण्याचा डाव

**महाआयटीमार्फतच कामे करावी; अहिल्यानगरमधील केंद्र संचालकांचे जिल्हाधिकारी यांना निवेदन**

नगर – एकात्मिक बाल विकास सेवा योजना मुंबई आयुक्तालयाच्या माध्यमातून आधार नोंदणी संच जमा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ही बाब अन्यायकारक असून, महाआयटी मार्फत अथवा व्हीएलईच्या माध्यमातूनच आधार कार्डची कामे सुरू ठेवण्यात यावी, अशी मागणी अहिल्यानगर जिल्ह्यातील व राज्यातील आधार नोंदणी केंद्र संचालकांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनातून केली आहे.

आधार
मेरा आधार, मेरी पहचान

जिल्ह्यात मागील अनेक वर्षांपासून शासकीय संस्था महाआयटीच्या माध्यमातून आधारशी संबंधित कामे केली जात आहेत. नियमानुसार सर्व सोपस्कार या आधार केंद्र संचालकांकडून करण्यात आले आहेत. तरीही मागील काही वर्षांपासून निश्चित केलेले कमिशन परत मिळत नसले तरीही, कामकाज सुरळीत सुरू आहे. असे असताना एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालयाच्या माध्यमातून आधार नोंदणी संच जमा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे आधार केंद्र संचालकांमध्ये एकच खळबळ माजली असून, एका खासगी कंपनीला हे केंद्र चालवण्यासाठी दिले जात असल्याची माहिती आहे. म्हणून हे संच जमा करून घ्यायचे आणि त्या खासगी कंपनीच्या घशात ही आधार केंद्रे घातली जाणार, अशी शंका निर्माण झाली आहे. ती कंपनी नंतर नव्याने या आधार केंद्रांचे वाटप करेल, अशी माहिती मिळाली आहे. त्यामुळे रोजगार जाण्याची भीती आधार केंद्र संचालकांना वाटत असून, ही बाब अन्यायकारक आहे.

महाआयटीमार्फत अथवा व्हीएलईच्या माध्यमातूनच आधार संबंधीत केंद्राची कामे यापुढेही सुरू ठेवण्यात यावी, अशी मागणी अहिल्यानगर जिल्ह्यातील आधार नोंदणी केंद्र संचालकांनी जिल्हा प्रशासनाला दिलेल्या निवेदनातून केली आहे.

निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी मुख्य कार्यपालन अधिकारी व जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी, महाआयटीचे जिल्हा समन्वयक यांना देण्यात आल्या आहेत.

यासोबतच नियमानुसार २०११ पासून आजतागायत निश्चित केलेल्या दरानुसार कमिशनही मिळाले नाही. त्यामुळे आधारशी संबंधित कामकाज महाआईटीकडेच ठेवण्यात यावे अश्या आशयाचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष आनंद दळवी, सचिव रिजवान शेख, उपाअध्यक्ष संजय बंचरे, केंद्र चालक सुयोग अव्हाड, अंकुश कदम, संतोष घोडेचोर, राम शिंदे, आनंद वाघ, जाहिर शेख, नवनीत वांढेकर, अशोक थोरात, प्रवीण बडे, आसिफ सय्यद, प्रकाश वैरागर, यस्मिन सय्यद, शिवप्रसाद गागरे, प्रसाद बनकर यासह जिल्ह्यातील आधार केंद्र चालक उपस्थित होते.

### रिअल टेल कंपनीला ठेका ?

रिअलटेल या खासगी कंपनीला आधार नोंदीचे कंत्राट दिल्याची बतावणी अधिकाऱ्यांकडून केली जात आहे. केवळ खासगी कंपनीचे खिसे भरण्यासाठी तर, हा उपद्रव केला जात नाही ना ? अशी शंका आहे. महिला आणि बालकल्याण विभागाकडून रिअलटेल या खासगी कंपनीला ते किट देण्याचा घाट सुरू आहे. महाआयटी ही शासकीय कंपनी आहे. मात्र, रिअलटेल या खासगी कंपनीला आधार किट देण्यास आधार केंद्र संचालकांनी विरोध केला आहे. खासगी कंपनीला जर हे कंत्राट गेले, तर सेवाशुल्क वाढवले जाऊ शकते व त्याचा भुर्दंड नागरिकांना बसू शकतो, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

### रोजगार हिरावला जाणार

गेल्या दहा वर्षांपासून आधार नोंदणी आणि अद्ययावतीकरणाचे काम केंद्र चालकांकडून केले जात आहे. परंतु आता हे किट जमा केले तर या संपूर्ण ६९ केंद्र चालकांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा मोठा प्रश्न निर्माण होणार असून, ते बेरोजगार होणार आहेत. सर्व केंद्रचालक महा–ई–सेवा केंद्र किंवा आपले सरकार केंद्र चालविणारेच असल्याने त्यांच्याकडे हे काम अत्यंत सुरक्षित सुरू आहे.

# नेप्ती, निमगाव व केडगावातील नागरिकांना बायपासवरील नाक्यावर टोलमाफी मिळावी


नगर – बायपासवरील टोल नाक्यावर नेप्ती, निमगाव वाघा आणि केडगाव येथील रहिवाशी नागरिकांना टोल माफी मिळावी, अशी मागणी ॲड. संतोष गायकवाड यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नेप्ती बायपासवर नुकताच सुरू झालेला टोलनाका व तेथील कर्मचाऱ्यांची अरेरावी पाहता स्थानिक नागरिकांना नेहमीच त्यांच्याशी हुज्जत घालावी लागत आहे. सदरील टोल नाक्यावरून केवळ टोल नाका पास करून जाण्याचा देखील टोल भरावा लागत आहे. नेप्ती आणि निमगाव वाघा येथील नागरिकांना सदरील टोल नाक्यावरून अधून–मधून अथवा नियमित जावे लागते. जो व्यक्ति दररोज जातो त्याने पास काढणे ठीक आहे. परंतू, किरकोळ कामासाठी आणि नेप्ती बायपास चौकात दोन–तीन मंगल कार्यालय असल्याने केडगाव, नेप्ती, निमगाव वाघा येथील नागरिकांना टोल नाका पास करण्याची वेळ आल्यास टोल नाका कर्मचारी विनाकारण हुज्जत घालतात आणि वाद घालतात. त्यामुळे, नेप्ती, निमगाव वाघा आणि केडगाव येथील नागरिकांना नेप्ती बायपासवर नव्याने सुरू झालेल्या टोल नाक्यावर टोल माफी मिळावी, अशी मागणी ॲड. गायकवाड यांनी केली आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील काही भागात २६ ते २९ डिसेंबर दरम्यान पाऊस, गारपिट

**भारतीय हवामान खात्याचा इशारा; सतर्कता बाळगण्याचे जिल्हा प्रशासनाचे नागरिकांना आवाहन**

नगर – जिल्ह्यात २६ आणि २९ डिसेंबर रोजी विजांच्या कडकडाट व वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस आणि २७ आणि २८ डिसेंबर रोजी विजांच्या कडकडाट व वादळी वाऱ्यासह गारपीट होण्याची शक्यता भारतीय हवामान खात्याने वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील नागरिकांनी दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.




मेघगर्जनेच्या वेळी वीज चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. विजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व विजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. विजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा, ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल, सायकल यांच्यापासून दूर रहावे.

मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत, दिव्यांचे खांब, धातूचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रान्सफॉर्मरवर जवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या, लांबणाऱ्या केबल्सपासून दूर राहावे. जाहिरात फलक (होर्डिंग्ज) कोसळून होणाऱ्या दूर्घटना टाळण्यासाठी दक्षतेची बाब म्हणून जाहिरात फलकांच्या (होर्डिंग्ज) आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी.

विजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जमिनीशी कमीतकमी संपर्क असावा. स्थानिक प्रशासनाद्वारे दिलेल्या सूचनांचे पालन करावे. गारपीटीदरम्यान मोकळ्या जागी आल्यास सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. धरण व नदीक्षेत्रामध्ये पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. नदीच्या पाण्याच्या प्रवाहामध्ये चढू किंवा उतरू नये, धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये.

वादळी वारे, वीज, पाऊस आणि गारपीट यापासून शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी वेळीच नियोजन करावे. शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल आणला असेल किंवा तसे नियोजन केले असल्यास शेतीमालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

स्वतःचे व जनावरांचे संरक्षण होईल याबाबत नागरिकांनी योग्य ती दक्षता घ्यावी. आपत्कालीन परिस्थितीत नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन यांचेशी संपर्क साधावा. तसेच जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथील दूरध्वनी क्र. १०७७ (टोल फ्री), ०२४१– २३२३८४४/ २३५६९४० वर संपर्क साधावा, असे प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी शाहूराज मोरे यांनी कळविले आहे.


टिप : मुव्ही–शो च्या वेळा बदलु शकतात दिनांक : 25 डिसेंबर 2024 ते 2 जानेवारी 2025

HIN- 11:30 AM 04:45 PM
MUFASA THE LION KING -3D

(HINDI) 8:30 AM I 9:45 AM 12:00 PM I 1:45 PM 4:25 PM I 6:45 PM 7:25 PM I 10: 35 PM
BABY JOHN
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher* - Offer Valid On Window Booking & Phone Booking

PUSHPA - 2 THE RULES
8:15 AM I 12:45 PM 3:00 PM I 07:00 PM 9:45 PM I 10:30 PM
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVALLBLE ON bookmyshow · CONNPLEX SMART THEATRE · AVALLBLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

SONI TILES Since 1965 AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज


Wishing you a very Merry Christmas
ISO 9001 : 2015 Certified Mandar MuLay 98222 94622 94220 87757

Ahilyanagar`s 1st Dolby 7.1 & Dolby Atmos Theater
SHOW TIMING

पुष्पा - २ 11.00AM 12.00PM I 03.45PM 06.05PM I 07.30PM 10.50PM

बेबी जॉन 08.00AM I 09.00AM 11.35AM I 02.30PM 03.00PM I 05.30PM 09.45PM I 11.10 PM

मुफासा (3D) Hindi 09.15AM I 8.30PM
टीप: शो च्या वेळा बदलू शकतात
Book Your Tickets at Box Office | Book Your Tickets Now bookmyshow
Near Nagar College, Above Zudio, A.nagar.
9881300400, 0241-2346000
Cinélife MINIPLEX

आंतरराष्ट्रीय दर्जाचे अद्यावत सुविधांयुक्त
इंडो आयरिश हॉस्पिटल
आयोजित
हृदयरोग, मधुमेह, उच्चरक्तदाब, पाठदुखी, गुडघेदुखी, स्त्रीरोग, बालरोग, किडनी विकार, डायलेसीस, जनरल सर्जरी, कान, नाक, घसा
मोफत सर्व रोग तपासणी शिबीर
सकाळी १० ते ५ वा. (रविवार सोडुन)
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना | आयुष्मान भारत योजना | मुख्यमंत्री सहाय्यता निधी
* मोफत ॲन्जीओप्लास्टी
* माफत डायलेसीस/किडनी विकार
* माफत कर्करोग शस्त्रक्रिया
* मोफत नवजात अतिदक्षता विभाग
* मोफत अपघात व पॉली ट्रॉमा फ्रॅक्चर
सर्व कॅशलेस सुविधा उपलब्ध | मोफत साखर तपासणी | २४ तास अत्यावश्यक व ॲम्ब्युलन्स सुविधा उपलब्ध | ॲडमिशनची गरज भासल्यास ५०% पर्यंत सवलत
सोनेग्राफी, एक्स–रे, पॅथालॉजी, सीटी स्कॅन, २डी इको, ईसीजी, एन्जीओग्राफी, वंधत्व निवारण व इतर सर्व तपासणीवर ५०% पर्यंत सवलत
* शिबीरस्थळ *
इंडो आयरिश हॉस्पिटल
तपोवन रोड, सावेडी, अहिल्यानगर.
फोन : 0241-2423336,
मो. 9130423336, 9860310001
टिप : नांव नोंदणी आवश्यक
मोफत ओ.पी.डी.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## मराठीतलं साधं सात्त्विक सौंदर्य – आशा काळे

उपजतच सौंदर्य लाभलेल्या आशाताई काळेंना निरलस, निरागस, सात्त्विक अन् मराठमोळं लावण्याचा आयाम होता. अस्सल कोल्हापुरी पोषाखातील त्यांचं रूप मराठी मनाला भुरळ न घालते तरच नवल! कथ्थक व बालवयातच नाट्य, सिनेसृष्टीत त्यांना संधी मिळाली.

सोज्वळ, सोशिक प्रतिमा, सात्त्विक सौंदर्य, सहजसुंदर अभिनय, नृत्य निपुणता लाभलेल्या आशाताईंनी जवळपास पाच दशके रसिकांच्या मन व भावविश्वावर अधिराज्य केले. ८०/९० च्या दशकातील बऱ्याच मराठमोळ्या माणसाला तर त्यासम आदर्श स्त्री आयुष्यात मिळावी असं वाटत असेल.

हिंदी सिनेमात विद्या सिन्हा तर आपल्या मराठी चित्रपटात आशाताई मला भारी आवडायच्या. तत्कालीन मध्यमवर्गीय स्त्रीरूपाचं प्रतिबिंब त्यांच्यात दिसायचे जणू!

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



नशीबवान, बाळा गाऊ कशी मी अंगाई, देवता, आई पाहिजे, माहेरची माणसे, कुलस्वामिनी अंबाबाई, ज्योतिबाचा नवस, हा खेळ सावल्यांचा, सतीची पुण्याई, थोरली जाऊ, पुत्रवती, चांदणे शिंपीत जाशी यासारखी चित्रपटे तर गहिरे रंग, गुंतता हृदय हे, घर श्रीमंतांचे, देव दीनाघरी धावला, पाऊलखुणा, फक्त एकच कारण, बेइमान इ. नाटकांतून त्यांनी प्रेक्षकांना सात्त्विक आनंद दिला. १४ डिसेंबरला या मराठमोळ्या सात्त्विक सौंदर्याच्या आशाताईंना गदिमा पुरस्काराने गौरवण्यात आलेय.

# अमित शाह यांच्या वक्तव्यांच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

### केंद्रीय गृहमंत्री पदाचा राजीनामा देऊन बहुजन समाजाची माफी मागावी

नगर – केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संविधानावरील चर्चेदरम्यान राज्यसभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावावरुन केलेल्या वक्तव्याचा बहुजन समाज पार्टीच्या वतीने मंगळवारी (दि.२४ डिसेंबर) जिल्हाधिकारी कार्यालया समोर निदर्शने करुन निषेध नोंदविण्यात आला. शाह यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करुन केंद्रीय गृहमंत्री शाह यांनी मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा व बहुजन समाजाची जाहीर माफी मागण्याची मागणी करण्यात आली.



अमित शाह यांच्या वक्तव्यांच्या निषेधार्थ बहुजन समाज पार्टीच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.

या आंदोलनात बहुजन समाज पार्टीचे जिल्हा प्रभारी सुनील ओहोळ, राजू खरात, जिल्हा उपाध्यक्ष शहानवाज शेख, जिल्हा महासचिव मेजर राजू शिंदे, उत्तर जिल्हा महासचिव प्रकाश अहिरे, सलीम अत्तार, राहुरी विधानसभेचे अध्यक्ष संजय संसारे, सुनील मगर, मच्छिंद्र ढोकणे, आकाश शेंडे, विठ्ठल गालफाडे, अण्णासाहेब धाकतोडे, चंद्रकांत लोंढे, श्रीरामपूर विधानसभा अध्यक्ष जाकीर शेख, श्रीगोंदा विधानसभा अध्यक्ष नितीन जावळे, जाकीर शहा, किरण भोसले, कचरू लष्करे, दिलीप सदाशिव, कैलास कोळगे, राहुरी महासचिव रामभाऊ लष्करे, सलीम अत्तार, भीमराव घोडके, अंबादास घोडके, शहर प्रभारी गणेश बागल, रवी कुमार आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी देशाच्या पवित्र संसदेत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान केला आहे. यामुळे देशातील बहुजन समाजासह संविधानाला मानणाऱ्या नागरिकांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. बाबासाहेब हे सर्व बहुजनांचे व उपेक्षित वर्गाचे मुक्ती दाते असून, त्यांनी ५ हजार वर्षे गुलामीत जगणाऱ्या समाजाला गुलामीतून बाहेर काढले. ते सर्व बहुजनांसाठी दैवताप्रमाणे असून, त्यांचा झालेला अवमान सहन केला जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांना देण्यात आले.

# अनधिकृत फ्लेक्स बोर्ड प्रकरणी शहरात १२ जणांवर गुन्हे दाखल

### मनपाची ७११ फलकांवर कारवाई करत ३४ हजारांचा दंड वसूल; विनापरवाना फलक लावल्यास कठोर कारवाई करणार

नगर – महानगरपालिका क्षेत्रात परवानगी न घेता मोठ्या प्रमाणात बॅनर, फलक, मोठे जाहिरात बोर्ड लावल्याचे प्रकार समोर आले आहेत. अशा अनधिकृत फलकांवर व फ्लेक्स बोर्डवर महानगरपालिकेमार्फत कारवाई सुरु करण्यात आली आहे. गेल्या महिनाभरात महानगरपालिका प्रशासनाने १२ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. तर ७११ फलकांवर कारवाई करत ३४ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

अनधिकृत फ्लेक्स बोर्ड संदर्भात कारवाईसाठी न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. या पार्श्वभूमीवर महानगरपालिका प्रशासनामार्फत सातत्याने आढावा घेऊन अनधिकृत फलकांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे. शहरातील प्रमुख रस्ते, चौक अशा ठिकाणी काही संस्था, नागरिक, व्यावसायिक आस्थापना, राजकीय कार्यकर्ते महानगरपालिकेची परवानगी न घेता फ्लेक्स बोर्ड लावत आहेत. महानगरपालिकेने याची तपासणी करून गेल्या महिनाभरात अनधिकृत फ्लेक्स लावणाऱ्या १२ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. ७११ फलकांवर दंडात्मक कारवाई करून ३४ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच, महानगरपालिकेमार्फत शहरात तात्पुरते फलक लावण्यासाठी तीन दिवसांसाठी १३४ फलकांना तात्पुरत्या परवानग्या दिल्या आहेत. त्या पोटी महानगरपालिकेला ८६ हजार ३६४ रुपये शुल्क प्राप्त झाले आहे. महानगरपालिका क्षेत्रात फलक लावण्यासाठी नागरिक, संस्था, व्यवसायिक आस्थापना, राजकीय कार्यकर्त्यांनी रीतसर अर्ज करून व शुल्क भरून परवानगी घ्यावी.

शहरात विनापरवाना फलक आढळल्यास दंडात्मक कारवाईसह गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा आयुक्त यशवंत डांगे यांनी दिला आहे.

## कायनेटीक चौकातील दोन मटका अड्ड्यावर छापा

नगर – नगर-पुणे रोडवरील कायनेटिक चौक येथे सुरू असलेल्या दोन मटका अड्ड्यावर कोतवाली पोलिसांनी छापा टाकून २ हजार १२० रुपयाचा मुद्देमाल जप्त करून दोघांना ताब्यात घेतले ही कारवाई केली. ही कारवाई मंगळवारी (दि. २४) दुपारी करण्यात आली.

कायनेटीक चौक येथील सना बेकर्सचे जवळील एका पत्र्याचे टपरीच्या आडोशाला येथे एक इसम हा लोकांकडुन पैसे घेवुन त्यांना चिठ्ठयांवर आकडे लिहून देवुन कल्याण मटका नावाचा हारजितीचा जुगार खेळत व खेळवीत आहे. अशी माहिती मिळाल्याने पोलिसांनी तेथे जाऊन छापा टाकत अश्पाक शाबिर खान (वय- ३९, रा. आशा टॉकीज चौक, अ.नगर) यास पकडले. त्याचे जवळ १ हजार ४० रुपये रोख रक्कम व कल्याण मटका जुगाराचे साहित्य असा मुद्देमाल मिळून आल्याने तो जप्त केला.

दुसऱ्या कारवाईत कायनेटीक चौकातील एका टपरीत सुरू असलेल्या मटका अड्ड्यावर छापा टाकून पोलिसांनी अशोक धोंडीराम आंबटकर (वय ६०, रा. मल्हार चौक, स्टेशन रोड) याला ताब्यात घेऊन त्याच्याकडील १ हजार ४० रुपये रोख रक्कम व मटका जुगाराची साधने असा मुद्देमाल जप्त केला

याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी पो.कॉ.संकेत धीवर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अशपाक खान, अशोक आंबटकर यांचेविरुध्द मुंबई जुगार कायदा कलम १२ (अ) प्रमाणे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल केले.

ही कारवाई पोलिस अंमलदार संदीप पितळे, सुजय हिवाळे, सुरज कदम, संकेत धिवर यांनी केली.

# विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या स्कूल बसला केडगाव बायपास नाक्यावर टोल माफी द्या

नगर – शहरात शाळा व महाविद्यालयात लहान मुलांना सोडविणाऱ्या स्कूल बसला केडगाव बायपास येथील टोल नाक्यावर टोल माफी मिळावी अशी मागणी आ. संग्राम जगताप यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

अ.नगर शहराच्या आजुबाजूस मोठ्या प्रमाणात शाळा व महाविद्यालये असुन मुलांना शाळेत किंवा महाविद्यालयात पोहचवण्यासाठी मोठ्या प्रमाणात स्कुल बस नगर शहरात असुन मुलांना शाळेत किंवा महाविद्यालयात पोहचवण्याचे काम केले जाते. त्यामुळे बायपास रोडवरुन जाणाऱ्या स्कुल बस यांना टोल माफी मिळावी. तसेच हे विद्यार्थी अहिल्यानगर शहराच्या २० कि.मी. च्या परिसरात राहणारे आहेत. अहिल्यानगर शहरातुन शाळेत किंवा महाविद्यालयात जाणाऱ्या स्कुल बस यांना केडगाव बायपास टोल नाक्यावर टोलमाफी देण्यात यावी, अशी मागणी आ. जगताप यांनी निवेदनाद्वारे केली आहे.



केडगाव बायपास टोल नाक्यावर स्कूल बसला टोल माफी द्यावी या मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देताना आ. संग्राम जगताप.

## समीर पाठक यांचे अल्प आजाराने निधन



नगर – येथील रहिवासी समीर अर्जुन पाठक (वय ४७, रा.डी.आर.हाईटस्, नवरंग व्यायाम शाळेजवळ, तोफखाना, नगर) यांचे २५ डिसेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले.

त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा असा परिवार आहे.

## संतोष भालेकर यांचे अल्प अजाराने निधन



श्रीरामपूर – येथील संतोष प्रभाकर भालेकर (वय ५३) यांचे अल्प अजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, सुन, नातु असा परिवार आहे. योगेश व रोहित भालेकर यांचे वडील होत.

## कमलाबाई चोरडिया यांचे संथाराव्रतात महानिर्वाण



श्रीरामपूर – आदर्शनगर, वॉर्ड नं.१, श्रीराम हौसिंग सोसायटी, श्रीरामपूर येथील श्रीमती कमलाबाई मांगीलाल चोरडिया (वय ८०) यांचे संथाराव्रतात महानिर्वाण झाले. दिपक, दिनेश, देवा चोरडिया व सौ.दर्शना पारस मुथा यांच्या मातोश्री, कांतीलाल, अभय, सुदर्शन, ऐंवता बाफना यांच्या भगिनी होत.

## अरुण परदेशी यांचे अल्पश: आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील टेलरिंग कारागीर अरुण बबनराव परदेशी (वय ६३) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. टेलरिंग व्यावसायिक अमोल परदेशी व स्वरा कॉम्प्युटरचे मालक सावन परदेशी यांचे ते वडील होत.

## अनिल कासलीवाल यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर – डावखर चौकातील महावीर किराणाचे मालक अनिल हिरालाल कासलीवाल (वय ६२) यांचे २५ डिसेंबर रोजी दुपारी १:३० वा. हृदयविकाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन बंधू, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. अतुल व निखिल कासलीवाल यांचे वडील, सुभाषचंद व कल्याणमल कासलीवाल यांचे बंधू, संतोष कासलीवाल यांचे चुलते, राजकुमार व सुनिल कासलीवाल यांचे चुलत बंधू होत.



गांधी मैदान येथे नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यास पकडल्यानंतर त्याच्या समवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

# नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यास पोलिसांनी गांधी मैदान येथे पकडले

नगर – राज्य शासनाने विक्री व वापरावर प्रतिबंध घातलेल्या नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या एकाला कोतवाली पोलिसांनी शहरातील गांधी मैदान परिसरात मंगळवारी (दि.२४) रात्री पकडले असून त्याच्याकडून ४९ हजार रुपये किंमतीचा नायलॉन मांजा जप्त केला आहे. आकाश रवि केळगंद्रे (वय २२, रा. जाधव मळा, बालिकाश्रम रोड) असे आरोपीचे नाव आहे.

कोतवाली पोलिसांना मंगळवारी रात्री माहिती मिळाली की गांधी मैदान येथे एक व्यक्ती बंदी असलेल्या नायलॉन मांजाची विक्री करत आहे. ही माहिती मिळताच पोलिस पथकाने तात्काळ गांधी मैदान येथे जावून पाहणी केली. तेथे त्यांना संशयित इसम आकाश रवि केळगंद्रे हा पांढऱ्या रंगाच्या गोण्या घेवून उभा असल्याचे आढळून आले. पोलिसांनी त्याला पकडून झडती घेतली असता त्याच्याकडे गोणीमध्ये ४९ हजार रुपये किमतीचे ७० नायलॉन मांजाचे बंडल्स आढळून आले. पोलिसांनी ते जप्त केले.

याप्रकरणी पो.कॉ. सुरज कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिस ठाण्यात केळगंद्रे याच्या विरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम २२३, १२५ सह पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ५, १५ अंतर्गत गुन्ह्याची नोंद केली. ही कारवाई पोलीस अंमलदार संदीप पितळे, दीपक रोहकले, तानाजी पवार, सुजय हिवाळे, सुरज कदम, राम हंडाळ, संकेत धिवर, अनुप झाडबुके, महिला अंमलदार दरंदले यांनी केली आहे.

# नायलॉन मांजावरील कारवाईसाठी सर्व पोलिस ठाण्यात स्वतंत्र पथके

### पोलिस अधिक्षक राकेश ओला, माहिती देण्याचे नागरिकांना केले आवाहन

नगर – घातक नायलॉन मांजाच्या वापरामुळे होणाऱ्या दुर्घटनांना प्रतिबंध करण्याकरीता तसेच नायलॉन मांजाची वाहतुक, साठवणुक, विक्रीवर कारवाईसाठी जिल्हा पोलीस दल सरसावले आहे. सर्व पोलीस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखेमार्फत नायलॉन मांजा विक्री व वापरास प्रतिबंध करण्याकरीता पथकांची स्थापना करण्यात आली आहे. तसेच जनतेकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारीची तात्काळ दखल घेऊन कायदेशीर कारवाई करण्यासाठी जिल्हास्तरावर पोलीस नियंत्रण कक्ष येथे कारवाईचा आढावा घेण्याकरिता पोलीस अंमलदार नियुक्त केलेले आहेत.

दरम्यान, पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, एलसीबी व सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना पोलीस ठाणे हद्दीत पथक कार्यान्वीत करून, नायलॉन मांजाचे विक्रेते व साठा वितरण करणाऱ्या दुकानदारांवर छापे टाकून कारवाई करणेबाबत आदेश दिले आहेत. आगामी मकरसंक्राती सणाच्या निमित्ताने पतंगबाजीमध्ये वापरण्यात येणार्या नायलॉन मांजाचा वापर होत असल्याने मनुष्य, पक्षी, प्राण्यांची जिवीत हानी, जखमी झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत. यामुळे पोलीस दलाने मोहिम हाती घेतली आहे.

स्थानिक गुन्हे शाखे मार्फत जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालय येथे जनजागृती करण्यात येत आहे. जिल्हा पोलीस प्रशासनाच्यावतीने नायलॉन मांजाबाबत तक्रार/माहिती देण्याकरीता नागरिकांनी डायल ११२ या क्रमांक किंवा पोलीस नियंत्रण कक्ष ०२१४ – २४१६१३२, स्थानिक गुन्हे शाखा ०२४१– २४१६१११ या ठिकाणी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. नायलॉन मांजाबाबत माहिती देणाऱ्या नागरिकांचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार आहे. बेकायदेशीर नायलॉन मांजा विक्री, वाहतूक व साठवणूक यांचेबाबत नागरिकांनी माहिती द्यावी, असे आवाहन अधीक्षक ओला यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांनी मोबाईलपासून दूर राहावे : आयुक्त यशवंत डांगे

### महानगरपालिका ओंकारनगर शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

नगर – विद्यार्थी व पालकांनी मोबाईलपासून दूर राहावे. आपण दररोज एक तास जरी मोबाईल पाहण्यासाठी घालवला तर वर्षाचे ३६५ तास आपण व्यर्थ घालवतो. बालपणापासूनच आपले ध्येय निश्चित करा व ते मिळवण्यासाठी जिद्दीने प्रयत्न करा. विविध महापुरुषांची चरित्रे वाचा. त्यामुळे शालेय जीवनापासूनच आपल्या मनावर विविध मूल्ये रुजतात. वार्षिक स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांना आपले सुप्त गुण प्रकट करण्याची संधी मिळते. ओंकारनगर शाळेने विविध स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यामुळे अहिल्यानगर महानगरपालिकेला ओंकारनगर शाळेचा अभिमान आहे. ओंकारनगर शाळेला महानगरपालिकेच्या माध्यमातून दोन नवीन वर्गखोल्या बांधून देण्यात येतील, असे अहमदनगर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे म्हणाले.



महानगरपालिका ओंकारनगर शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.

केडगाव येथील प्रथम आय.एस.ओ.मानांकन प्राप्त ओंकारनगर प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी डॉ. सचिन धस होते. तर कार्यक्रमासाठी आयुक्त यशवंत डांगे, नगरसेवक अमोल येवले, महाराष्ट्र बालक मंदिर प्रशालेचे माजी मुख्याध्यापक सुरेश शेवाळे, लायन्स क्लबचे अध्यक्ष डॉ.सुदर्शन गोरे, माजी उपायुक्त आर. ए. देशमुख, भैरवनाथ सायकलचे सोमनाथ बनकर, आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, संग्राम कोतकर, पोस्ट मास्तर संतोष यादव, सुयश कटारिया, सप्तरंगचे नंदेश शिंदे, विकास अधिकारी तुषार देशमुख, बलभीम कर्डिले, ॲड.उज्वला घोडके, मनिषा शिंदे, विक्रम लोखंडे उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, बालगीत, लावणी, प्रबोधनपर नाटीका, विविध बहारदार नृत्य सादर करत उपस्थितांची मने जिंकली. डॉ. सचिन धस, माजी मुख्याध्यापक सुरेश शेवाळे, नगरसेवक अमोल येवले यांनी आपल्या मनोगतातून ओंकारनगर शाळेतील विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले.

पित्रोडा फर्निचरचे परेश पित्रोडा यांनी सर्व विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक दिले. सप्तरंगचे नंदेश शिंदे यांनी आदर्श विद्यार्थी व आदर्श विद्यार्थीनीला सन्मानचिन्ह दिले. अवधूत इलेक्ट्रॉनिकचे अजित पवार यांनी इयत्ता पहिली ते पाचवीच्या प्रथम क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस दिले.

अध्यक्षीय सुचना वृषाली गावडे यांनी मांडली तर शिवराज वाघमारे यांनी अनुमोदन दिले. प्रस्ताविक मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी यांनी केले.

कार्यक्रमासाठी महानगरपालिका शाळांचे मुख्याध्यापक अक्षय सातपुते, विजय घिगे, शशिकांत वाघुलकर, छाया गोरे, सुवर्णा झिने, शिक्षक योगेश राजळे, अमोल बोठे, युवराज मोरे, संदिप राजळे, सुनिल रोटे, ज्योती टाळके, ज्योती गहिले, दिपाली शेवाळे, अमृता शिंदे, प्रियंका पुंडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरुण पवार यांनी केले.

कार्यक्रम यशस्वीपणे सहशिक्षक शिवराज वाघमारे, सहशिक्षिका वृषाली गावडे, प्रियंका लोळगे, दिपाली साळवे, भावना पवार, पुनम बडे, पल्लवी भुजबळ, दुर्गा घेवारे, कवित वाघमारे, गणेश पाडळे यांनी परिश्रम घेतले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### प्या पितळेच्या भांड्यातील चहा

तुम्हाला माहित आहे का की चहा बनवण्यासाठी पितळेचे भांडे वापरल्याने त्याचे फायदे अनेक पटींनी वाढतात? पितळेच्या भांड्यांमध्ये चहा बनवल्याने त्वचा निरोगी आणि चमकदार होते. मुरुम, सुरकुत्या आणि डाग यापासून मुक्त होण्यास मदत होते.

## पाककला

### ब्रेड गुलाब जामून

**साहित्य** : दहा ब्रेड स्लाइस, १/४ कप मिल्क पावडर, दोन चमचे तूप, १/४ चमचा वेलची पूड, दूध, दीड कप साखर, दीड कप पाणी

**कृती** : सर्वात आधी ब्रेड बारीक करून घ्या. एका भांड्यात ब्रेडचा चुरा, मिल्क पावडर, तूप, वेलची पूड आणि थोडे दूध एकत्र करून मऊ पीठ तयार करावे. आता या पिठाचे छोटे गोळे बनवावे. कढईत तूप गरम करून हे गोळे सोनेरी होईपर्यंत मंद आचेवर तळून घ्यावे. तसेच एका पातेलीत पाणी आणि साखर मिक्स करावी व पाक बनवून घ्यावा. पाक थंड झाल्यानंतर गुलाबजामुन पाकमध्ये घालावे.

## वास्तू

### मॉपिंगसंबंधी नियम

✻ मॉपिंगसाठी नेहमी नवीन आणि स्वच्छ कपडे वापरा. नियमितपणे स्वच्छ करा. नकारात्मक ऊर्जा बाहेर टाकण्यासाठी ताजी हवा आत येऊ द्या. मॉपिंगसाठी जुनी कपडे वापरल्याने नकारात्मकता निर्माण होते. त्यामुळे शक्यतो नवीनच कपडे वापरा.

✻ तुमच्या घरात उदबत्ती किंवा धूपबत्ती जाळून धुराने घराला आणि स्वतःला शुद्ध करा.

## सल्ला

बाभुळ व चिंच ही झाडे घरासमोर लावू नकात यामुळे नकारात्मक शक्ती निर्माण होतात.

## सौंदर्य

मेंदीमध्ये दही, आवळा पावडर, मेथी पावडर मिसळून घोळ तयार करा आणि केसांना लावा. १ ते २ तास केसांमध्ये ठेवल्यानंतर केस धुवा. असे केल्याने केस काळे, दाट आणि चमकदार होतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २६ डिसेंबर २०२४

**सफला एकादशी, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, मार्गशीर्ष कृष्णपक्ष, स्वाती १८।१०, सूर्योदय ०६ वा. ३५ मि. सूर्यास्त ०६ वा. ७ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : जर आपणास एका कार्यात वाढ मिळाली तर इतर कार्यात अवनती होणे शक्य आहे.

**वृषभ** : सामुदायिक कार्यांमध्ये अनुकूल. सहकार्यांकबरोबर प्रतिष्ठा वाढेल. आरोग्य उत्तम राहील.

**मिथुन** : मनोरंजनाच्या विषयांमध्ये वेळ खर्च होईल. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील.

**कर्क** : गृह भूमीसंबंधी विषयांमध्ये लाभ मिळेल. खरेदी-विक्रीत लाभ मिळण्याची स्थिती बनेल.

**सिंह** : आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या नव्या संधी देईल परंतु घाई करणे वादाला कारण ठरू शकते. जुनी मित्र भेटतील.

**कन्या** : कौटुंबिक वातावरण सुखद राहील. आर्थिक प्रयत्नांमध्ये स्थिती अनुकूल राहील. सौंदर्याकडे आकर्षण वाढेल. तब्येत बिघडेल.

**तूळ** : आरोग्य उत्तम राहील. सामुदायिक उपक्रमांमध्ये समक्षता आपणास सुविख्यात बनवेल.

**वृश्चिक** : आपल्या जीवनातील इच्छित वस्तूवर लक्ष द्याल. कौटुंबिक प्रकरणांमध्ये कोणत्याही प्रकारचे विवाद टाळाल.

**धनु** : व्यापार-व्यवसायात स्थितीत सुधार होईल. अनुकूल स्थिती मिळेल. वरिष्ठांशी वितुष्ट येण्याची शक्यता आहे.

**मकर** : नेहमीपेक्षा अधिक चांगले काही घडण्यासाठी आपणास आपल्या कामात एकाग्रता वाढवाल.

**कुंभ** : एखाद्या जुन्या मित्राशी भेट होण्याची शक्यता आहे. व्यापार-व्यवसायात आशानुरूप परिणाम मिळतील. पैसे व पाकीट चोरीला जाईल.

**मीन** : वेळेचे सदुपयोग केल्याने यश मिळेल. आरोग्य उत्तम राहील. आपल्या हातात आलेल्या संधी जातील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

जोशी : मी इथले टॉयलेट वापरु का ?
नेने : हो, पण पैसे पडतील....!
जोशी : नाही पडणार.... बसताना काळजी घेईन....!!


# जागतिक आश्चर्ये

## पॉंपी शहर (इटली)

*२४ ऑगस्ट इ.स.७९ मध्ये व्हेसिव्हीस येथील ज्वालामुखी खूप मोठ्या प्रमाणात कार्यरत झाला की या डोंगराच्या वरील भाग पूर्णपणे नष्ट झाला. त्या ज्वालामुखीतून बाहेर आलेल्या लाव्हारसामुळे पर्वत पूर्णपणे नष्ट झाला व त्यामुळे उत्पन्न झालेल्या दगडमातीमुळे एकेकाळी वैभवाच्या शिखरावर असलेले रोमन शहर पॉंपी त्या ढिगाऱ्याखाली पूर्णत: गाडले गेले.*

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# शब्दगंध क्र. ७०७९ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) मोठेपणा; थोरवी; महिमा; महती ४) हो म्हणणे ६) एक प्रकारची घोडागाडी ८) कापड; वस्त्र; कपडा ९) बाणेदार; गर्व बाळगणारा १०) बिनवासाचे एक फूल १२) एक वृक्ष; पळस १३) गमक; पुरावा; आधार १५) सरंजाम; वेष; अलंकार १६) एक शस्त्र; समशेर १८) गरम मसाल्यातील एक तिखट पदार्थ २०) दयाशील; कृपाळू २१) पंजाबमधील एक नदी २२) तीव्र उठणारी वेदना; सणक; तिडीक

**उभे शब्द :-** १) कणखर; दणकट; तगडा २) नटांत श्रेष्ठ; परमेश्वर ३) तापट; रागीट ४) यज्ञ; आहुती; हवन ५) रात्रीचा चंद्र; एक दिवंगत योगी जे 'ओशो' म्हणून गणले जातात ७) एक हजार किलो किंवा दहा क्विंटल वजनाचे माप ९) माळ; हार ११) आवश्यकता किंवा नड असलेला १२) एक चर्मवाद्य; मृदंग; पखवाज १३) नक्कल; कॉपी १४) पती; यजमान; स्वामी १५) गरीब; प्रामाणिक; नीतिमान १७) दाणेदार; कणीदार १९) विटीदांडूच्या खेळात विटी जेथून कोलतात तो छोटा खड्डा

### शब्दगंध क्र. ७०७८ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्र | पं | च | ■ | सं | पा | द | क |
| ■ | ध | र | प | क | ड | ■ | न |
| चा | र | ण | ■ | ल | ■ | ना | क |
| क | व | ■ | अ | न | न | स | ■ |
| व | डा | र | ■ | ■ | र | का | ना |
| त | ■ | ट | क | म | का | ■ | ■ |
| ■ | वा | र | स | ■ | सु | म | न |
| सं | क | ट | ■ | स | र | का | र |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : जीवनातील सर्वोत्कृष्ट शिक्षण हे अपयशातून मिळते.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## वेळेचा शोध कोणी लावला?

वेळेचे मोजमाप १५०० इ.स.पू. च्या काही काळापूर्वी प्राचीन इजिप्तमध्ये सनिडियलच्या शोधापासून सुरू झाले. तथापि, आजचे घड्याळे मोजण्याइतके इजिप्शियन लोक जेवढे वेळ मोजले तेवढेच नव्हते. इजिप्शियन लोकांसाठी आणि खरंच पुढच्या तीन हजार वर्षांच्या काळासाठीचा मूलभूत घटक म्हणजे दिवसाचा प्रकाश होता. इजिप्शियन लोकांनी सूर्योदय होण्यापासून ते सूर्यास्तापर्यंतच्या काळाचे बारा तुकडे केले आणि आजच्या काळाचे पूर्वदर्शन दिले. सूर्यापासून स्वतंत्रपणे वेळ म ोजण्याच्या मार्गाच्या आवश्यकतेमुळे अखेरीस विविध उपकरणे, विशेषत: वाळूचे घड्याळ, वॉटरक्लॉक्स आणि मेणबत्त्या वाढल्या. यापैकी पहिल्या दोनने वेळेचे मोजमाप करण्यासाठी काही पदार्थांच्या प्रवाहाचा उपयोग केला, नंतर मेणबत्तीच्या उंचीवर स्थिर पडणे. तिघांनीही सतत वाहणारी काहीतरी म्हणून काळासाठी एक रूपक प्रदान केले आणि अशा प्रकारे आपण काळाचा विचार करण्याच्या पद्धतीला आकार देऊ लागला.

जरी त्यांची अचूकता कधीही उत्तम नव्हती, परंतु या आकाशात सूर्य दिसण्याची गरज न पडता या साधनांनी वेळ मोजण्याचा एक मार्गच प्रदान केला नाही तर त्यांनी काळाच्या संकल्पनेला देखील आधार दिला जो दिवसाच्या लांबीवर अवलंबून नाही. . पण त्या शक्यतांचा फायदा घेण्यापूर्वी अनेक शतके होण्याची गरज होती. त्याऐवजी, या प्रत्येक वेळेचे मोजमाप करणार्या डिव्हाइसमध्ये सनलियलच्या आधारे वेळ देण्यासाठी डिझाइन केलेल्या खुणांची विस्तृत प्रणाली चालविली गेली. फ्रान्समध्ये सापडलेल्या तेराव्या शतकाच्या वॉटरक्लॉकच्या तुकड्यांनी वर्षाच्या प्रत्येक दिवसासाठी घड्याळ कसे सेट करावे याबद्दल सूचना दिल्या! कारण अंधाराचे तास हे दिवसाच्या प्रकाशाच्या तासांचे प्रतिपक्ष आहेत, रात्रीच्या वेळेचे तास फक्त अर्ध्या वर्षाच्या आदल्या दिवसाचे दिवसाचे प्रमाण होते. उदाहरणार्थ, १ जुलै रोजी रात्रीचे स्केल १ जानेवारीसाठी दिवसाचे स्केल होते.

मध्ययुगीन काळाचा एक गट ज्याचा दिवस काळाच्या आधारे राज्य केले जात असे अशा लोकांप्रमाणे बेनेडिक्टिन भिक्षू होते, त्यांच्या धार्मिकदृष्ट्या नियमितपणे प्रार्थना केल्याच्या आठ वेळा, कॅनोनिकल आठ तास: कौतुक (अगदी पहाटेच्या आधी), प्राइम (पहाटेच्या ठीक नंतर), टेरेस (तिसरा तास), सेक्स्ट (सहावा तास), नॉन (नववा तास), वेस्पर (अकरावा तास), कंपलाइन (सूर्यास्तानंतर) आणि मॅटिन (रात्री) प्रत्येक प्रामाणिक तास जाहीर करून संन्यासींच्या दिवसाचे नियमन करणारे संकेत म्हणजे एक वाजणारी बेल होती. हे आपल्याला आमचा शब्द घड्याळ देते जो मध्यकालीन लॅटिन शब्द घंटा, क्लोका या शब्दापासून आला आहे.

## हुशार शेतकरी

एका गावात एक शेतकरी राहत होता. त्याला प्राणी पाळण्याचा खूप खूप छंद होता. त्याच्याकडे शेळी, मेंढी, वाघ, गाय अशा प्रकारचे खूप प्राणी होते. शेतात त्यांना रोज चारण्यासाठी घेऊन जाई. वाघ व शेळी या दोघांना तो नेहमी सोबत ठेवत असत त्याला शेळीला वाघ खाईल याची त्याला भीती वाटते. एके दिवशी तो नदी पार करून आपल्या शेतात जातो. मध्ये गेल्यावरती तो शेळी साठी एक गवताची पेंडी तयार करतो. व खूप पाऊस चालू होतो. त्याला घरी येता वेळेस नदी पार करून यावे लागत.

नदीला खूप पूर आला होता. शेतकरी शेळी वाघ व गवताची पिंडी घेऊन नदीकिनारी येतो. काही सुचत नाही की आता नदी कशी पार करावी.काय करावे असे तो विचारात पडतो तो मदत होईल का ते पाहू लागतो.

किनारी त्याला एक नाव दिसते तो त्या नावे जवळ जातो. एका वेळेस दोन जणांना घेऊन जाईल या अवस्थेत होती. शेतकऱ्यापुढे प्रश्न पडला की आपण यांना नदीकिनारी कसे घेऊन जावे. शेतकरी विचार करतो की आपण जर पहिल्यांदा गवताची पेंडी घेऊन गेलो तर वाघ शेळीला खाऊन टाकेल व वाघाला घेऊन गेलो शेळी गवत खाऊन टाकेल.

तो विचार करतो आणि नावे मध्ये शेळीला घेऊन दुसऱ्या टोकाला सोडून येतो. वाघाला घेतो आणि दुसऱ्या टोकावर ती सोडून येतो आता तो आधी आपल्यासोबत परत या टोकावर घेऊन येतो व गवताला घेऊन जातो परत तो वापस येतो व शेळीला घेऊन जातो. अशी करून तो नदी सुखरूप पार करतो.

तात्पर्य : विचार करून काम केले तर कोणतीच गोष्ट अशक्य नाही

# रहमते दर्शन (भाग - १)



## कृपासिंधू

उस दिन ४ फरवरी का दिन था और अगले दो दिनों में दिल्ली में महाराज कृपालसिंह जी का जन्म ोत्सव भी शामिल था। मैंने डॉक्टरों से प्रार्थना की कि हमें दो दिन का समय इस शुभ कार्य के लिए दिया जाये। केस काफी गम्भीर था, परन्तु न जाने क्यों, डॉक्टरों ने हमसे बच्ची को बड़े ध्यान से रखने का वायदा लिया और दवाई लिखकर दो दिन की छुट्टी दे दी। हम सब बच्ची को साथ लेकर ५ फ़रवरी को कृपाल आश्रम, दिल्ली चले गये और समय पाकर, समय के धन्वंतरि वैद्य दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी से दया-मेहर की भीख माँगी। महाराज जी ने अपनी मौज में आकर बच्ची पर अपनी दया-मेहर भरी दृष्टि डाली और ये वचन अपने मुखारविंद से फ़रमाये, जाओ और बच्ची को आश्रम के आयुर्वेदिक वैद्य से दवा दिला दो। ऑपरेशन की कोई आवश्यकता नहीं है। हमने बहुत इलाज करवाये थे। यकीन नहीं आ रहा था कि वैद्य की दवाई से कुछ आराम भी होगा कि नहीं। ख़ैर ! वैद्य जी से दवाई ली और जैसे वैद्य जी ने खुराक देने को कहा, देनी शुरू कर दी। अगले ही दिन हम डॉक्टर के पास रोहतक पहुँचे और बच्ची की जाँच करवाई। डॉक्टर ने बच्ची को चैक किया तो हैरानी के चिन्ह उसके चेहरे पर साफ नज़र आ रहे थे। हमने घबरा कर डॉक्टर से उसकी हैरानगी का कारण पूछा तो उसका उत्तर था, की ज़रूरत नहीं है, क्योंकि बच्ची बिल्कुल ठीक है। यह था दयाल अब ऑपरेशन पुरुष की दया का एक नमूना ।

इसी प्रकार एक दूसरी घटना मेरी पत्नी के साथ घटी। मेरी पत्नी स्त्री रोग से पीड़ित हो गई। रोग इतना गंभीर था कि उसके शरीर में ख़ून की कमी हो गई। कोई किसी के भी पास जाने को कहता, वहीं मैं अपनी पत्नी को ले जाता, मगर किसी वैद्य, डॉक्टर की दवाई का कोई असर नहीं हुआ और मर्ज़ बढ़ता गया, ज्यों-ज्यों दवा की । पैसा ख़र्च हो रहा था। नौकरी की आमदनी से मैं कहाँ तक इलाज करवाता। महाराज दर्शनसिंह जी से अर्ज़ की, तो उन्होंने वसन्त विहार में होम्योपैथिक डॉक्टर के पास जाने का परामर्श दिया। हम दवाई देते रहे। आराम भी आ गया परन्तु ५-६ महीने पश्चात फिर वही हालत हो गई। तत्पश्चात हम मैडिकल हस्पताल, रोहतक पहुँचे। वहाँ जाँच के पश्चात डॉक्टरों ने ऑपरेशन करने को कहा। मैं बहुत घबरा गया । एक दिन की छुट्टी लेकर मैं पत्नी सहित महाराज जी के पास जा पहुँचा। पर महाराज जी दर्शन देकर जा चुके थे। हमने कोठी के सामने नीम के पेड़ के नीचे बैठ कर रो-रो कर मन ही मन महाराज जी से गुहार की। संयोगवश हमें सरदार मनोहर सिंह जी मिल गये तो हमने अपनी व्यथा उनसे कही।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

## दिमाग की शक्ती

दवाइयों के साइड एफेक्ट के कारण भी निंद्रा रोग हो जाता है। नींद की कमी से चिड़चिड़ापन होने लगता है। हताशा भी बढ़ने लगती है। नींद की कमी के कारण सदा थकावट बनीं रहती हैं। आप नींद में खराटे लेते हैं, नींद में दम घुटता है और उठ जाते हैं, सुबह उठते हैं तो सिर दर्द हो जाता है और मुंह में सूखापन या गले में खराश होती है तो यह निंद्रा रोग है। आप की नींद डिस्टर्ब है। तनाव से बचें, रोगो का सही इलाज कराएं, बुक्स पढ़ते रहें, तब आप रोगो से बच पाएंगे। कई बार दौड़-भाग भरी अपनी बिजी लाइफ में हमको नकारात्मकता घेर लेती है और उस दौरान ऐसा लगता है मानो सब कुछ खत्म हो गया है, सब कुछ बेकार और बेमाना लगने लगता है, ऐसा लगता है कि हम दूसरों से पीछे रह गए और सब आगे बढ़ते जा रहे हैं। इस सोच की मुख्य वजह तनाव यानि की स्ट्रेस और थकान है और हमारी ये नकारात्मक सोच हमको डिप्रेशन जैसी कोई मानसिक बीमारी का शिकार बना देती है जिसके कारण हमें नींद नहीं आती। जब भी नकारात्मकता महसूस करें तो तुरंत अपना मन पसंद संगीत सुने। संगीत में ऐसी इनर्जी होती है जो हर गम और परेशानी को भुला देती है। नींद बहुत अच्छी आती है।

मूड बदलने और भावनाओ को बदलने की शक्ति होती है। जब मूड खराब हो तो कभी भी सैड म्यूजिक नहीं सुनना। पोजिटिव इन्ज के प्रवाह के लिये प्रेरणदायक वीडियो देखना भी लाभदायक है। ज्यादा निराशा हो तो धीमी गति पर संगीत, घर के किसी कोने में २४ घंटे चालू रखो। संगीत के कम्पनों से सब कुछ ठीक हो जाएगा। दिमाग और योग निंद्रा

जब आप निंद्रा में होते हैं तो बाहरी शरीर स्थिर होता है परंतु आप के आंतरिक अंग चलते रहते हैं। दिल धड़कता रहता है, खून दौड़ता रहता है, सांस चलता रहता है, आंते कार्य करती रहती हैं। निंद्रा में अवचेतन मस्तिष्क भी कार्य करता रहता है। कल्पनाएं स्वप्नों के रूप में चलती रहती हैं। आप केवल टांगो के द्वारा निष्क्रिय रहते हैं, बाकी आंतरिक अस्तित्व चलता रहता है। यह सिद्ध करता है कि नींद में भी हमारा आंतरिक मन काम करता रहता है, फिर भी हम आराम और शांति से रहते हैं।

जब हम काम धंधे में व्यस्त होते हैं परंतु आंतरिक मन से भी कुछ न कुछ सोचते रहते हैं। जब हम आंतरिक मन से नकारात्मक सोचते हैं तो हमें अशांति या दुःख अनुभव होता है। अगर हम कार्य करते हुए आंतरिक मन को सकारात्मक सोच में लगाए रखें तो हमें वैसी ही शांति और आराम अनुभव होगा जैसा हमें नींद में होता है। यही योग निंद्रा है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

## व्यायामाचे प्रकार

**४) वज्रासन प्रकार १ ला :**

कती-बैठक स्थितीमध्ये एक पाय गुडघ्यात मुडपून पंजा नितंबाखाली होईल असे बसावे नंतर दुसरा पाय मुडपून तोही नितंबाखाली घ्यावा. दोन्ही पायाच्या पंजावर बसावे त्यानंतर दोन्ही हात नमस्कार स्थितीमध्ये ठेवून डोक्यावर सर्व शरीर खेचून घ्यावेत. **वेळ** : १ ते २ मिनिटे करावा.

**फायदे** – यामुळे हाताचे, पाठीचे व पायांचे स्नायू मजबूत होतात.

**५) वज्रासनाचा प्रकार २ रा :**

कृती – वज्रासनात बसून दोन्ही गुडघे सावकाशपणे एकमेकांपासून लांब करावेत. म्हणजेच दोन्ही मांड्यामध्ये अंतर करावे. यानंतर आपले दोन्ही हात गुडघ्यांवर ठेवावेत. वेळ : १ ते २ मिनिटे करावा. फायदा – याच्या अभ्यासाने स्वाधिष्ठानचक्र, हृतचक्र, अनाहतचक्र हे क्रियाशील होतात; त्यामुळे गर्भवतीमध्ये असणारा थकवा, अशक्तपणा, मानसिक त्रास व चिडचिड कमी होते.

**६) गोमुखासन : कृती –**

डावा पाय मागील बाजूस वाकवून, डाव्या टाचेला नितंबाच्या डाव्या बाजूखाली ठेवा. नंतर उजवा पाय अशा प्रकारे वाकवा की, उजवा गुडघा डाव्या गुडघ्यावर येईल आणि उजव्या पायाचा तळवा डाव्या मांडीखाली येईल. या आसनाचा नियमित सराव केल्यानंतरच उजव्या पायाची टाच डाव्या मांडीपर्यंत आणता येईल. आता डावा हात कोपराशी वाकवून डोक्याकडे न्या आणि मानेखाली खांद्याच्या मध्ये टेकवा. आता उजवा हात कोपराशी वाकवून मागील बाजूने वर घ्या. त्यानंतर डाव्या हाताचे पहिले व दुसरे बोट आणि उजव्या हाताचे पहिले व दुसरे बोट एकमेकांत गुंफवा. जर बोटे सरकू लागली, तर पुन्हा दोन मिनिटांपर्यंत प्रयत्न करा. सावकाश श्वास घ्या. शरीराचा वरचा भाग आणि मस्तक एका सरळ रेषेत ठेवा. स्थूल गर्भवतीला हे आसन प्रथम काही दिवस अवघड जाईल; परंतु सतत सराव केल्यास हे आसन बरोबर करता येईल.

**वेळ** – ३ ते ५ मिनिटे करावे. **फायदे** : या आसनामधून तीनही (जालंदरबंध, उड्डीयानबंध आणि मूलबंध) दृढतापूर्वक होत असल्याने सुषुम्ना नाडीमध्ये प्राणवायूचा प्रवाह सुरू होतो व त्यामुळे गर्भवतीचे मन एकाग्र होण्यास मदत होते. म्हणजेच या आसनामुळे गर्भवतीच्या हार्मोन्सचे प्रमाण संतुलित होऊन तिला मानसिक शांती मिळते व बाळाला देखील प्राणवायूचा पुरवठा होतो. गर्भवतीच्या दृष्टीने हे आसन फार महत्त्वाचे आहे. या आसनामुळे गर्भवतीच्या बद्धकोष्टता, मंदाग्नी, अरुची, कंबरदुखी व हातातील लचक इत्यादी तक्रारी दूर होतात. या आसनामुळे फुप्फुसाची आणि हृदयाची शक्ती वाढते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००



जितो अहमदनगर प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धेत 'नमोह ९९' संघाने विजेतेपद पटकावले. समवेत जितोचे पदाधिकारी.

# 'जितो प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धेत' 'नमोह ९९' संघाने पटकावले विजेतेपद

नगर – जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो) अहमदनगर शाखेच्या वतीने आयोजित अहमदनगर प्रिमियर लीग ३.० क्रिकेट स्पर्धेत नमोह ९९ संघाने विजेतेपद पटकावले आहे. मुलांच्या संघांच्या स्पर्धेत ए.एम. वारियर्सने विजेतेपद मिळविले. ब्ल्यू फिनिशर्स संघाला उपविजेतेपद मिळाले. मालिकावीर किताब नमोह ९९ संघाचे कुणाल नहार यांना मिळाला.

साईनगर टर्फ येथे झालेल्या या स्पर्धेत ८ मुख्य आणि ३ मुलांच्या संघांचा सहभाग होता. अतिशय चुरशीने झालेल्या प्रत्येक सामन्यात खेळाडूंनी आपल्या सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी परिश्रम घेत खेळाचा आनंद लुटला.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभास प्रमुख अतिथी म्हणून माजी कुलगुरू डॉ. एस.बी. निमसे, स्पर्धेचे मुख्य प्रायोजक गाल ग्रुपचे परेश लोढा, सहप्रायोजक पीकेबी अलकेन ग्रुपचे पुनित भंडारी, जितो अहमदनगरचे संस्थापक चेअरमन गौतम मुनोत, माजी चेअरमन जवाहर मुथा, सल्लागार समितीचे अमित मुथा, जितो अहमदनगरचे चेअरमन आलोक मुनोत, सेक्रेटरी तुषार कर्नावट, रेस्ट ऑफ महाराष्ट्रचे युथ कन्व्हेनर गौतम मुथा, खुशबू मुनोत, लेडीज विंग चेअरमन संगीता मुथियान, सेक्रेटरी अंशु मुनोत, जितो युथ विंग चेअरमन चेतन भंडारी, सेक्रेटरी यश भंडारी, निखिल गांधी, चिराग शेटिया, संघ संचालक विजय गुगळे, प्रीतेश दुगड़, अमित पोखरणा, निलेश चोपड़ा, आशीष मुनोत, अजीत बोरा, संजोग गुगळे, अनुज सोनीमंडलेचा आदींसह संचालक व सभासद उपस्थित होते.

माजी कुलगुरू डॉ. निमसे म्हणाले की, जितो संघटनेने समाजातील युवांना व्यापार, उद्योग, व्यवसाय, शिक्षण तसेच खेळासाठी अतिशय चांगले व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. मैदानी खेळामुळे प्रत्येकात संघ भावना, नेतृत्व गुण विकसित होतात. त्याचा उपयोग वैयक्तिक आयुष्यात काम करताना होत असतो.

चेतन भंडारी म्हणाले, स्पर्धेत एकूण ११ संघांनी सहभाग नोंदवला. यात ८ मुख्य संघ व ३ मुलांच्या संघ होते. विशेष म्हणजे प्रत्येक संघात युवा आणि महिलांचाही समावेश होता. सर्व सामने अतिशय चुरशीने झाले. खेळीमेळीच्या वातावरणात सर्वांनी निखळ आनंद लुटला. नवीन वर्षातही युवा वर्गासाठी जितो मार्फत विविध उपक्रम राबवून युवा वर्गाला प्रोत्साहन दिले जाईल. कार्यक्रमाच्या शेवटी यश भंडारी यांनी आभार मानले. स्पर्धेच्या नियोजनासाठी रितेश पटवा, वैभव मुनोत, दर्शन चोपडा, सुरज कर्नावट, मनोज चोपडा, सिद्धार्थ मुनोत, सौरभ गुंदेचा आदींनी परिश्रम घेतले.

# जीवनातील ध्येय प्राप्तीसाठी कठोर परिश्रमांना पर्याय नाही

## अशोक कडूस यांचे प्रतिपादन; पंडित नेहरू हिंदी विद्यालयात विविध क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

नगर – जीवनातील ध्येय प्राप्तीसाठी कठोर परिश्रमांना पर्याय नाही. परिश्रम जिद्द चिकाटीने यश मिळते. विजयाने हुरळून जाऊ नका व पराभवाने खचू नका. प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये विविध कलागुण दडलेले असतात ते ओळखून त्या गुणांना विकसीत करण्याचे अशोक कडूस यांनी सांगितले. तर विविध क्षेत्रात यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.



पंडित नेहरू हिंदी विद्यालयात विविध क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

भुईकोट किल्ला येथील जिल्ह्यातील एकमेव हिंदी माध्यमच्या पंडित नेहरू हिंदी विद्यालयातील कला, क्रीडा, शैक्षणिक व विविध स्पर्धेत नैपुण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा पार पडला. माध्यमिकचे शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकारी (योजना) बाळासाहेब बुगे, मनपा शिक्षण विभागाचे प्रशासनाधिकारी जुबेर पठाण, संस्थेचे सचिव किशोर मुनोत, मुख्याध्यापक सुहास धिवर, शिक्षक परिषदेचे शहर जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे आदींसह सर्व शालेय शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

प्रारंभी ढोलच्या गजराने व महाराष्ट्रातील पारंपारिक लेझिम पथकाने पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. पारंपारिक वेशभूषेतील विद्यार्थिनींनी लेझिमचे बहारदार सादरीकरण केले. यामध्ये भारत मातेच्या वेशभूषेत आलेल्या विद्यार्थिनीने सर्वांचे लक्ष वेधले.

जुबेर पठाण म्हणाले की, स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी गुणवत्ता महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी शालेय जीवनातील विविध उपक्रम आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी फक्त बौद्धिक क्षमता नव्हे, तर इतर कलागुण देखील विकसीत झाले पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये संस्कारासह सामाजिक एकतेची भावना निर्माण करणे काळाची गरज बनले असल्याचे त्यांनी सांगितले.

बाळासाहेब बुगे म्हणाले की, हिंदी ही आपल्या देशाची राष्ट्र भाषा आहे. संपूर्ण जिल्ह्यात एकमेव हिंदी स्कूलमध्ये शिक्षण घेत असल्याचा प्रत्येक विद्यार्थ्याला अभिमान असावा. जीवनात स्पर्धा महत्त्वाची असून, प्रत्येक स्पर्धेत उतरा. तुम्ही किती आनंदी? यापेक्षा तुमच्यामुळे किती लोक आनंदी हे महत्त्वाचे आहे. भाषेमुळे ज्ञान व विचारांची देवाणघेवाण होते. बौद्धिक विकास साधण्याचे काम भाषा करत असते. विविध ज्ञान आत्मसात करण्यासाठी इतर भाषा देखील अवगत करण्याचे आवाहन केले. तर जिथे मैदान जास्त, तेथे दवाखाने कमी. मात्र आपल्या समाजात दवाखान्यांची वाढती संख्या चिंताजनक बाब असल्याचे स्पष्ट करुन, विविध मैदानी खेळ खेळण्याचा त्यांनी संदेश दिला.

किशोर मुनोत म्हणाले की, जीवनात यश प्राप्तीसाठी संस्कार व शिस्त महत्त्वाची आहे. मोबाईलमुळे जीवनाचा महत्त्वाचा वेळ वाया जात आहे. शरीराच्या विकासासाठी खेळ व बुध्दीच्या विकासासाठी वाचन महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. तर विद्यार्थ्यांच्या सदृढ आरोग्यासाठी व्यायाम, आहार यावर मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक कमल भोसले यांनी केले. उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते विविध क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला. पाहुण्यांचे स्वागत मुख्याध्यापक सुहास धिवर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय बाबासाहेब बोडखे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कविता शर्मा–जोशी यांनी करुन आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शालेय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



## तायक्वांदो स्पर्धेत रोशन चित्ते याला कांस्यपदक

नगर जिल्हा तायक्वांदो असोसिएशन यांच्यातर्फे आयोजित स्पर्धेमध्ये वर्क स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज अरणगाव या शाळेतील इयत्ता पाचवीचा विद्यार्थी रोशन चित्ते याला कांस्यपदक मिळाले. त्याचे अभिनंदन करताना शाळेचे मुख्याध्यापक डॉ. रामिन हुसेन, उपमुख्याध्यापिका शबनम मॅडम, क्रीडा शिक्षक अनिल शिंदे व शिक्षक वृंद.



## कोहिनूर मॉल मधील 'कॉन्प्लेक्स मल्टिप्लेक्स'च्या लॉबी डिझाईनला गोल्ड पारितोषिक

अहिल्यानगर येथील प्रणील प्रमोद मुनोत (नेवासकर) यांच्या कोहिनूर मॉल मधील कॉन्प्लेक्स मल्टिप्लेक्स थिएटरच्या लॉबी डिझाईनला FOAID या संस्थेकडून संपूर्ण भारतातील लॉबी डिझाईनला गोल्ड पारितोषिक मिळाल्याबद्दल सन्मान करण्यात आला. यावेळी आर्कि. सुचित मुथ्था, मंदार खेले व सौ.अनुजा खेले, मॉलचे संचालक अश्वीन गांधी, मल्टिप्लेक्स थिएटरचे प्रणिल मुनोत (नेवासकर) आदी.



## ब्रह्माकुमारीजतर्फे अभिनेता पुनीत इस्सार यांना निमंत्रण

दिल्लीतील बेल्लामाँड हॉटेलमध्ये अभिनेता पुनीत इस्सार यांची राजयोगी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या माउंट अबू येथून प्रकाशित होणाऱ्या ओम् शांति मीडियाचे संपादक राजयोगी बीके डॉ. गंगाधर यांनी भेट घेऊन त्यांना संस्थेच्या कार्याची माहिती दिली व संस्थेच्या आंतरराष्ट्रीय मुख्यालय माउंट अबूला भेटीचे निमंत्रण देऊन निराकार परमात्म्याची फ्रेम भेट दिली. यावेळी बीके जया, बीके विकास व बीके डॉ. दिपक हरके उपस्थित होते.

# केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांची भारतीय किसान संघ शिष्टमंडळाबरोबर बैठक

नगर – महाराष्ट्रातील शेतीविषयक विषयावर भारतीय किसान संघाच्या शिष्टमंडळासोबत पुण्यातील गोखले इन्स्टीट्यूट येथे केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याबरोबर बैठक झाली. या प्रसंगी संघाचे संघटनमंत्री चंदन पाटील, प्रांत कोषाध्यक्ष बबन केंजळे, ग्रो इकॉनॉमिक सेंटरचे पांडुरंग सिगेदार, प्रांत मंत्री डॉ. संतोष गटणे, पुणे जिल्हा अध्यक्ष अ‍ॅड. अशोकराव फडके उपस्थित होते. या बैठकीमध्ये किसान मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस संदीप गिड्डे पाटील, रवींद्र अमृतकर, अ‍ॅग्रीकॉसचे प्रांत संयोजक राहुल भोसले, आणि सहसंयोजक रविंद्र निगुडे यांचाही सहभाग होता. २०२४ –२५ या आर्थिक वर्षात खरीप आणि रब्बी हंगामातही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना गंभीर समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य झाल्यास अडचणी दूर होतील.

१) सोयाबीन डीओसी वर १०% निर्यात अनुदान दिल्यास सोयाबीनचा भाव वाढू शकतो.

२) केंद्र आणि राज्य सरकारचा सोयाबीन खरेदीचा प्रयत्न अभिनंदनीय आहे. परंतु राज्य पणन प्रशासन, एनसीसीएफ आणि नाफेड या संस्थांच्या अपुऱ्या प्रयत्नांमुळे फक्त १०% खरेदी झालेली आहे. यामध्ये लक्ष घालून सोयाबीन खरेदी वेगाने व्हावी असे आदेश संबंधीत संस्थांना देण्यात यावेत.

३) लिमन, तूर, पिवळा मटार यांची आयात झाल्यामुळे महाराष्ट्रामध्ये तुरीचे भाव एम एस पी च्या ही खाली गेलेले आहे. आयात होण्यापूर्वी हे भाव बरे होते. आयातीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. यासाठी शेतकऱ्यांना भावांतर राशी मिळावी अशी आमची मागणी आहे. याशिवाय पुन्हा शेतकऱ्यांचे नुकसान होईल यासारखी आयात पुन्हा होऊन नये याची व्यवस्था करण्यात यावी.



केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांची भारतीय किसान संघ शिष्टमंडळाबरोबर बैठक पार पडली.

४) महाराष्ट्रात सी सी आय द्वारे होणारी कापसाची खरेदी फेब्रुवारीपर्यंत करण्यात यावी.

५) कांद्यासाठी चढ–उतार (Fluctuating) स्वरूपातली निर्यात शुल्क नीती असायला हवी जेणेकरून ग्राहक आणि शेतकरी यांनाही न्याय मिळेल.

६) महाराष्ट्रातील कृषी उत्पादनांचा उत्पादन खर्च आणि एम एस पी यामध्ये ३० ते ४० टक्क्यांचे अंतर रहात असल्यामुळे होणाऱ्या तोट्यामुळे शेतकरी शेती सोडत आहेत किंवा आत्महत्या करण्यासाठी बाध्य होत आहेत. यासाठी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना एसजी एसटी किंवा सीजीएसटी मुक्त कृषी निविष्ठा मिळाव्यात.

७) उत्पादन खर्च कमी होण्यासाठी जे उपाय करायचे आहेत यामध्ये छोटी शेत जमीन असलेल्या शेतकऱ्यांचा विचार करून छोटी यंत्रे विकसित करण्यात यावीत. परदेशातून आयात केलेल्या यंत्रांमुळे आपले परावलंबित्व वाढत आहे. यासाठी संशोधन करून अशा यंत्रांचा विकास वेगामध्ये केला जावा. यामुळे मनुष्य बळाचा यशस्वी उपयोग केला जाऊ शकतो.


८) महाराष्ट्रामध्ये रासायनिक खते आणि औषधांच्या विक्रीमध्ये कंपन्या आणि होलसेल व्यापारी यांच्याकडून काळाबाजार होत आहे आणि लिंकिंग करून वस्तू खरेदी करण्यासाठी विवश केले जात आहे यावर उपाय केले जायला हवेत.

९) निर्माण मध्ये बदलाव केल्यामुळे विमा कंपन्या, पुढारी आणि प्रशासकीय अधिकारी यांच्या दृष्टीमुळे पिक विमा योजनेमध्ये शेतकऱ्यांना लाभ मिळत नाही.

१०) वन्यजीवांच्या अतिक्रमणामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना भयमुक्त शेती करणे शक्य होत नाही. यासाठी योग्य त्या उपायांची आवश्यकता आहे. यासाठी संबंधित सर्व खात्यांमध्ये समन्वय करण्यात यावा. आणि ठोस उपायांनी शेतीचे संरक्षण करण्यात यावे.

११) जीएम आणि एचटीबीटी बियाण्याची बेकायदा विक्री होत आहे. यामुळे जे शेतकरी या बियाण्याचा वापर करत नाहीत त्यांना नाईलाजाने तो करावा लागत आहे. यासाठी देशामध्ये या प्रकारच्या बियाणांची निर्मिती प्रक्रिया आणि विक्री ताबडतोब बंद करण्यात यावी.

या ११ मागण्यांसंदर्भात केंद्रीय कृषिमंत्री यांची भूमिका अत्यंत सकारात्मक राहिली. राष्ट्रीय शेतकरी दिनाच्या दिवशी केंद्रीय कृषिमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींबरोबर शेतकऱ्यांच्या समस्यांसंबंधी चर्चा करून याविषयी मार्ग काढण्याचे ठोस आश्वासन दिलेले आहे. आवश्यकतेनुसार पुढील काळात कृषिमंत्री नेहमी भारतीय किसान संघाच्या प्रतिनिधी सोबत चर्चेसाठी उपलब्ध राहणार आहेत. शिवराजसिंह चौहान यांचा या प्रसंगी भगवान बलराम यांची प्रतिमा देऊन आणि मराठमोळा फेटा बांधून शाल, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. मध्यप्रदेशाप्रमाणे संपूर्ण देशाला कृषी क्षेत्रात प्रगतीपथावर नेण्याचे काम शिवराजसिंह चौहान यांच्याद्वारे होईल अशी अपेक्षा शेतकरी नेत्यांनी व्यक्त केल्याची माहिती जिल्हा मंत्री, भारतीय किसान संघ अहिल्यानगरचे निलेश चिपाडे यांनी दिली आहे.




माध्यमिक विद्यालय निंबळक येथे पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.

# माध्यमिक विद्यालय निंबळक येथे पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन

नगर – ग्रामविकास विद्या प्रसारक मंडळाचे माध्यमिक विद्यालय इसळक निंबळक येथे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी संस्थेने स्नेहसंमेलन हे हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. माध्यमिक विद्यालय निंबळक येथील वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभाचे पहिले पुष्प १७ डिसेंबर रोजी गुंफले त्यामध्ये कार्यक्रमाचे उदघाटन लॉरिट्झ नुडसेन इलेक्ट्रिक आणि ऑटोमेशन कंपनीचे डायरेक्टर अरविंद पारगावकर यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शिवसेनेचे उपनेते भाऊ कोरगांवकर यांनी भूषविले. पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. या दिवशी कार्यक्रमास भाऊ कोरगावकर, उद्योजक बाबु टायरवाले, नागेंद्र राठोड (उद्योजक रायगड), राजेंद्र दळवी (उद्योजक), रामदास भोसले, विक्रम कासार (सचिव एन डी फार्मा कॉलेज), रावजी नांगरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. अरविंद पारगावकर व भाऊ कोरगावकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

अरविंद पारगावकर यांनी आईस्क्रीम शब्दाद्वारे विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, इच्छाशक्ती, सकारात्मकता, क्रियाशीलता, महत्वाकांक्षा या गुणांचे महत्व पटवून दिले. उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे कौतुक केले.

ग्रामविकास विद्या प्रसारक मंडळाचे सहसचिव व माजी सदस्य जिल्हा नियोजन समिती, नगर अविनाश भाऊसाहेब कोतकर, अध्यक्ष नितीन भाऊसाहेब कोतकर, सचिव रघुनाथ दामू गव्हाणे, उपाध्यक्ष पंढरीनाथ मारुती लामखडे, डॉ. किसन शंकर कोतकर, कविता विक्रम कासार, मनोज शिवाजीराव गायकवाड, संदिप माधवराव कोतकर, खजिनदार जयश्री रावसाहेब म्हस्के, ह.भ.प. संदिप मारुती कळसे, वैशाली मनोज गव्हाणे, मुख्याध्यापक रहाटळ बी. के, पर्यवेक्षक मगर व्ही. एम, अश्विनी हेंबाडे (मुख्याध्यपिका पूर्व प्राथमिक), महेश कोतकर (विद्यार्थी प्रतिनिधी), कु. समीक्षा शेवाळे (विद्यार्थिनी प्रतिनिधी), पूर्व प्राथमिक, माध्यमिक विभागाचे सर्व सेवकवृंद उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता जाजगे यांनी केले.

# पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये भरले गणित–विज्ञान प्रदर्शन

नगर – विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रुजावा व गणिताची आवड निर्माण होण्याच्या उद्देशाने पोदार इंटरनॅशल स्कूलमध्ये गणित–विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विविध नाविन्यपूर्ण संकल्प सादर करुन उपस्थितांना अवाक केले.



पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये गणित–विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण संकल्प सादर करुन उपस्थितांना अवाक केले.

विविध प्रकल्प सदर करुन विद्यार्थ्यांनी त्याची माहिती दिली. या प्रदर्शनात इयत्ता पहिली पासून ते इयत्ता नऊवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. तीनशेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यासाठी शाळेतील विज्ञान शिक्षिका नलिनी काटरपवार, डायना सत्राळकर, वैष्णवी खरवडकर, हिना शेख, शलाका सराफ, ऋतिका ढेकळे, ऐश्वर्या पिल्ले यांनी विद्यार्थ्यांना उपकरणे तयार करण्यासाठी विशेष मार्गदर्शन केले.

या प्रदर्शनात तयार केलेल्या उपकरणांचे परीक्षण किरण कालरा, रोहित रामदिन, भावेश मिश्रा आणि अजिमा शेख यांनी केले. तर त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन सादर केलेल्या प्रकल्पाचे कौतुक केले.

शाळेचे प्राचार्य मंगेश जगताप म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाची आवड निर्माण होऊन त्यांच्यामध्ये संशोधकवृत्ती निर्माण झाली पाहिजे. विज्ञान प्रदर्शनाच्या माध्यमातूनच भविष्यातील वैज्ञानिक घडतील. त्यांच्या जिज्ञासू वृत्तीला विज्ञान प्रदर्शनातून प्रोत्साहन मिळणार असल्याचे स्पष्ट करुन, जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी मोठी स्वप्ने पाहा आणि ती स्वप्ने साकार करण्यासाठी प्रयत्न करण्याचे त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन शिक्षिका मीनल राठोड यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या उपप्राचार्य शगुफ्ता काझी, आशुतोष नामदेव सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# अपयशाने खचून न जाता परिश्रम घेत रहावेत

## आयुक्त यशवंत डांगे यांचा सल्ला; रेसिडेन्शिअल हायस्कूलमध्ये शालेय वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ



रेसिडेन्शिअल हायस्कूलमध्ये शालेय वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात विद्यार्थ्यांना पारितोषिक देताना मनपाचे आयुक्त यशवंत डांगे. (छाया – सागर इंगळे)

नगर – जीवनामध्ये स्पर्धा अपरिहार्य आहे, स्पर्धा आपण टाळू शकत नाही. ससा आणि कासवाच्या गोष्टीच्या माध्यमातून सातत्यपूर्ण प्रयत्नांचे महत्व विशद केले. त्याचबरोबर अपयशाने खचुन न जाता परिश्रम घेत रहावेत असे विशद केले. महात्मा गांधीनी बालपणी पाहिलेल्या राज्य हरिश्चंद्र या नाटकातून मिळालेल्या प्रेरणेविषयी सांगितले. मोबाईलच्या अतिरेकी वापरापासून दूर रहाण्याचा सल्ला दिला. शालेय जीवनातील आठवणींना उजाळा मनपाचे आयुक्त यशवंत डांगे यांनी दिला.

रेसिडेन्शिअल हायस्कूलमध्ये शालेय वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना यशवंत डांगे बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्था सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, संस्था सदस्य ॲड. माधवेश्वरी म्हसे, राज्य क्रीडा मार्गदर्शक जानेश्वर खुरांगे, प्राचार्य पोकळे सर, उपप्राचार्य पा. वांडेकर सर, पर्यवेक्षक म्हस्के सर, सातपुते सर, दारकुंडे मॅडम, शिक्षक प्रतिनिधी अनंत कुलकर्णी, विद्यार्थी प्रतिनिधी युवराज भळगट, खेडकर श्रावणी, हिंदवी टेमकर, श्रेयस वाघुले आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना राज्य क्रीडा मार्गदर्शक जानेश्वर खुरांगे म्हणाले की, शालेय जीवनातील आवडता दिवस म्हणजे स्नेहसंमेलनाचा दिवस, आवडता तास म्हणजे खेळाचा तास असतो. शासनातर्फे आपल्या जिल्हात १३ प्रकारच्या क्रीडा स्पर्धा घेतल्या जातात. खेळाडूंसाठी २५ मार्क, शासकीय नोकऱ्यांमध्ये राखिव जागा अशा सवलती मिळतात. विद्यार्थ्यांनी आवडीचा खेळ जोपासावा, असे सांगितले

अध्यक्षीय मनोगत ॲड. विश्वासराव आठरे पाटील म्हणाले की, आयुष्यामध्ये यशस्वी होण्यासाठी 'मी कसा घडलो' हे आचार्य अत्रे यांचे पुस्तक वाचण्याचा सल्ला दिला. आचार्य अरे आणि जयकर यांच्यातील नाते कसे होते हे उलगडून सांगितले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना उपयोजित ज्ञान द्यावे. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व हे वर्गखोल्या बरोबरच क्रीडांगणावर घडत असते. विविध क्षेत्रांमध्ये योगदान देणारे विद्यार्थी शाळा महाविद्यालयां मधून घडावेत. विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्याकरता ध्येय निश्चित करावे असा मोलाचा सल्ला देखिल दिला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रिडा संचालक बळीराम सातपुते यांनी केले. पाहुण्यांचा परिचय पर्यवेक्षिका व्ही. एस. दारकुंडे यांनी करून दिली. विद्यालय प्रगतीचा अहवाल वाचन शिक्षीका प्रतिनिधी श्रीम. वंदना राऊत यांनी केले.

सूत्रसंचालन गावडे एस. एस., अमृते पी. एम., चौधरी डी. डी., श्रीमती लबडे ए. जी. यांनी केले. तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षक डी. सी. म्हस्के यांनी मानले.

# उत्कृष्ट अष्टपैलू कामगिरीसाठी आयकॉन स्कूलच्या तीन विद्यार्थिनींना 'विद्या किरण' पुरस्कार प्रदान



आयकॉन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनी सई जगताप, उमा रंजन आणि युक्ति देसरडा यांना 'विद्या किरण' पुरस्काराने गौरविताना संचालक कर्नल आर.सी. राणा

नगर – द आयकॉन पब्लिक स्कूलच्या इयत्ता १० मधील सई जगताप, उमा रंजन आणि युक्ति देसरडा या तीन विद्यार्थ्यांनींना नुकतच प्रतिष्ठित विद्या किरण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार असाधारण अष्टपैलू कामगिरीचे प्रदर्शन करणाऱ्या मुलींना प्रोत्साहन देण्यासाठी गर्ग फाऊंडेशन तर्फे प्रदान करण्यात आला.

विद्यार्थ्यांची निवड गर्ग फाऊंडेशनच्या निवड समितीने कठोर प्रक्रियेच्या आधारे केली होती. ज्यात मुलाखती, उद्देश विधाने आणि पुनरावलोकन यांचा समावेश होता. त्यांचे शैक्षणिक समर्पण, सह-अभ्यासक्रम क्रियाकलाप आणि एकूणच उत्कृष्टतेमुळे ते त्यांच्या समवयस्कांमध्ये वेगळे ठरले.

प्रत्येक विद्यार्थ्याला प्रमाणपत्र आणि रोख बक्षीस देण्यात आले. मुख्याध्यापिका दीपिका नगरवाला यांनी यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव देतानाच शाळा त्यांच्यातील प्रतिभा हेरून प्रोत्साहन देत असते. नेतृत्व क्षमतांना संधी आणि ओळख प्रदान करण्यावर विश्वास ठेवते. विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनातील प्रत्येक पैलूमध्ये उत्कृष्ट बनविण्यास सक्षम करण्यावर भर दिला जातो. संचालक कर्नल आर.सी. राणा, आराधना राणा यांच्यासह संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांनींचे अभिनंदन केले आहे.

# महिला व्यायामशाळेत जागतिक ध्यानदिवस साजरा

## आहारतज्ज्ञ, योगशिक्षिका ज्योती येणारे यांचे महिलांना मार्गदर्शन



केडगाव येथील महिला व्यायामशाळेत जागतिक ध्यानदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महिलांना मार्गदर्शन करताना आहारतज्ज्ञ, योगशिक्षिका ज्योती येणारे.

नगर – केडगाव येथे महानगरपालिका महिला व्यायाम शाळा येथे जागतिक ध्यान दिवस साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने आहार तज्ञ आणि योगशिक्षिका ज्योती येणारे यांनी आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये ध्यानाचे महत्त्व आणि योगाचे महत्त्व समजून सांगितले.

आहार तज्ञ आणि योगशिक्षिका ज्योती येणारे असे वेगवेगळ्या प्रकारचे सामाजिक उपक्रम राबवत असतात, जेणेकरून महिलांमध्ये जागृती निर्माण करण्याचे काम त्या करतात. या ध्यान दिवसाच्या निमित्ताने त्यांनी महिलांना संदेश दिला. आपले स्वास्थ्य शरीर आणि मन हे दोन्हीही जर निरोगी असेल तर आपण आणि आपले कुटुंब कायमस्वरूपी आनंदी आणि उत्साही राहू शकतो जवळजवळ आज एक वर्ष झाले आहे. त्यांचा योग क्लास केडगाव येथे नियमितपणे चालू आहे. गेले सात वर्षे त्या आहारतज्ञ म्हणून अहिल्यानगरमध्ये काम पाहतात. काहीही झाले तरी स्वतःसाठी आपण एक तास काढणे खूप गरजेचे आहे, हीच निरोगी राहण्याची खरी गुरुकिल्ली आहे. व्यायाम करण्यासाठी, ध्यानधारणा करण्यासाठी आपण जो कंटाळा करतो, त्यामधूनच आपल्याला आजार निर्माण होतात किंवा टेन्शन येते, निगेटिव्हिटी वाढते, स्ट्रेस, त्याच्यातून झोप न येणे हे सगळे आजार तयार होतात. बीपी, थायरॉईड, डायबिटीस आणि पीसीओडीसारखे आजार आपल्याला जडतात. महिलांना मार्गदर्शन करून त्यांच्याकडून व्यवस्थितपणे व्यायाम आणि रोजच्या रोज ध्यानधारणा करून घेतली जाते, असे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी रत्नमाला भोर, राधाबाई येणारे, दिपाली मेहेर, संगीता जाधव, नेहा ओझा, सोनाली कोळपकर, नीता रोकडे, शोभा धामणे, नैना पालेकर, सोनिया दीक्षित, वसुधा दहातोंडे, मीनाक्षी काठमोडे, शीतल जांगडा, ज्योती सातपुते, सारिका भापकर, सुनंदा सोनवणे, सुवर्णा चोरडिया, मेघा कावरे, पूनम देशमुख उपस्थित होत्या.

# रेडिओ नगर तर्फे रफी के गीत गायन स्पर्धेत १५ जणांची निवड



स्नेहालयाचे लोक माध्यम रेडिओनगर ९०.४ एफएम तर्फे रफी के गीत या स्पर्धेतील विजेत्यांसमवेत सुहासभाई मुळे व रेडिओ नगरचे व्यवस्थापक संदीप क्षीरसागर आदी.

नगर – स्वर्गीय मोहम्मद रफी यांच्या १०० व्या जन्मदिनाच्या निमित्याने स्नेहालयाचे लोक माध्यम रेडिओनगर ९०.४ एफएम तर्फे रफी के गीत अशी स्पर्धा घेण्यात आली आली. सदर स्पर्धेचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते व संगीत समीक्षक सुहासभाई मुळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये रेहमत सुलतान हॉल येथे झाले.

सावेडी येथील नाट्य संकुल ६ महिन्यात पूर्ण होऊन अशा कार्यक्रमांसाठी मोफत उपलब्ध करून दिले जाईल असे आमदार संग्राम जगताप यांनी यावेळी सांगितले

या स्पर्धेस प्रतिसाद मिळाला, शहर व जिल्ह्यातून ७५ स्पर्धकांनी यामध्ये सहभाग नोंदवला. तब्बल सहा तास चाललेल्या या स्पर्धे मधून १५ स्पर्धक निवडण्यात आले.

प्रथम क्रमांक १) सागर शेळके, द्वितीय क्रमांक २) राजेंद्र शहाणे, किरण खोडे व युगलगीत, तृतीय क्रमांक ३) सईद खान, ४) सुभाष पाटोळे, ५) मुख्तार शेख, ६) रामनाथ गव्हाणे, ७) जितेंद्र देवकर, ८) सुलतान खान, ९) महेश घावटे, १०) दीपक धायतडक, ११) डॉ. शैलेन्द्र खंडागळे, १२) अनिरुद्ध कुलकर्णी, १३) डॉ.विवेकानंद केंगे, १४) राम द्रुमणे, १५) सुनील हळगावकर १६) वैभवी गोडसे व विवेक गोडसे, युगल गीत या प्रमाणे पुरस्कार देण्यात आले.

स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून शिवरंजन संगीतालयाचे संचालक ज्येष्ठ संवादिनी वादक प्रकाश शिंदे यांनी काम पाहिले. पुरस्कार वितरण रेडिओ नगरचे व्यवस्थापक संदीप क्षीरसागर व सुहासभाई मुळे यांच्या हस्ते करण्यात आले. सदर स्पर्धकांची गाणी रेडिओ नगर वरून प्रसारित करण्यात आली.

# 'अहमदनगर मर्चंटस'च्या गुलमोहोर रोड शाखेतील कर्मचाऱ्याचा प्रामाणिकपणा

## रोख भरण्यात जमा झालेली १ लाख रुपयांची अतिरिक्त रक्कम खातेदारास केली परत



नगर – अहमदनगर मर्चंटस को ऑपरेटिव्ह बँकेच्या गुलमोहोर रोड शाखेत खातेदाराकडून रोख भरणा करताना जमा झालेली १ लाख रुपयांची अतिरिक्त रक्कम कॅशियरच्या प्रामाणिकपणामुळे खातेदारास परत मिळाली आहे. मर्चंटस बँक कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिकपणाचे आणखी एक उदाहरण समोर आले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, मर्चंटस बँकेच्या गुलमोहोर रोड शाखेत स्पीडेज पेट्रोलियम कंपनीचे खाते आहे. या खात्यात कंपनीचे कर्मचारी १४ लाख ५० हजार रुपयांचा रोख भरणा करण्यासाठी आले असता त्यांच्याकडून नजरचुकीने १ लाख रुपये अतिरिक्त जमा झाले. कॅशियर प्रितम विनोद मुथा यांच्या लक्षात ही बाब येताच त्यांनी पासिंग अधिकारी संतोष ठाकूर यांच्या निदर्शनास आणून दिले. सर्व गोष्टीची खातरजमा करून शाखाधिकारी बी. आर. ठोके यांनी संबंधित कंपनीशी संपर्क साधून अतिरिक्त रोख रक्कम परत केली.

या प्रामाणिकपणाबद्दल बँकेचे संस्थापक व विद्यमान चेअरमन हस्तीमल मुनोत यांनी प्रितम मुथा यांना पत्र लिहून अभिनंदन केले आहे. प्रामाणिक आणि संस्थेप्रती निष्ठावान असलेले कर्मचारी बँकेसाठी भूषणावह आहेत. त्यामुळेच बँकेची विश्वसनीयता कायम वृध्दींगत झाली आहे. खातेदार, सभासदांना सर्वोत्कृष्ट बँकिंग सेवा देतानाच प्रामाणिक व सुरक्षितता यांचा अनुभव येतो. यासाठी अधिकारी, कर्मचारी कौतुकास पात्र आहेत.

या प्रामाणिकपणाबद्दल कॅशियर प्रितम मुथा व शाखेतील अधिकाऱ्यांचे बँकेचे व्हाईस चेअरमन अमित मुथा, सर्व संचालक मंडळाने तसेच सीईओ सुनील पुराणिक, जॉइंट सीईओ नितीन भंडारी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.




उपअधीक्षक भूमी अभिलेख अहमदनगर कार्यालय येथे अल्पसंख्याक दिन साजरा करण्यात आला.

# उपअधीक्षक भूमी अभिलेख अहमदनगर कार्यालय येथे अल्पसंख्याक दिन साजरा

नगर – उपअधीक्षक भूमि अभिलेख अहमदनगर हातमपुरा येथे अविनाश मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ट्रेन महासंघाचे केंद्रीय अध्यक्ष एन. एम. पवळे उपस्थित होते. मिसाळ यांचा सत्कार अय्यूब शेख यांनी केले. रामदास गवळी यांचा सत्कार जमीर शेख यांनी केले. गोल्डन ग्रुप महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष आरिफ शेख यांचा सत्कार आर.पी.आय चे जिल्हा संघटक गणेश कदम यांनी केले. मिलिंद भिंगारदिवे यांचा सत्कार प्रवीण गायकवाड यांनी केले.

कदम साहेब यांचा सत्कार मोईन देशमुख यांनी केले. सुनील साळवे यांचा सत्कार रामदास गवळी यांनी केले. अय्यूब शेख यांचा सत्कार अमोल कानडे यांनी केले. जहीर सय्यद यांचा सत्कार रवी डीक्रूज यांनी केले. अल्तमश जरीवाला यांचा सत्कार गणेश गरड यांनी केले. नासिर सय्यद यांचा सत्कार खलील पठाण यांनी केले. दत्तात्रय कार्ले पाटील यांचा सत्कार यांनी केले. जाकीर शेख यांचा सत्कार रामदास गवळी यांनी केले. आबिद खान दूलेखान यांचा सत्कार सत्यम थोरवे यांनी केले. बन्सी नाना वाळुंज अध्यक्ष प्रगती ग्राम विकास संस्था टाकळी ढोकेश्वर यांचा सत्कार अविनाश मिसाळ सर यांनी केले. डॉ. राजवैद्य यांचा सत्कार अमोल कानडे यांनी केले.

अध्यक्षीय भाषणातून मिसाळ सर म्हणाले की, अल्पसंख्यांक समाजाला न्याय मिळाला पाहिजे. त्यानंतर आरिफ शेख यांनी अल्पसंख्यांक कायद्याची माहिती दिली आणि हा कायदा सन १९९२ ला अस्तित्वात आला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात सदर कायद्याचा उल्लेख केलेला आहे. सदर कायद्यामुळे अल्पसंख्यांक समाजाला सुरक्षितता मिळते आणि न्याय मिळते हे सर्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे झालेले आहे आणि अल्पसंख्यांक समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे अशी प्रमुख मागणी कास्ट्राइब कर्मचारी कल्याण महासंघ जिल्हाध्यक्ष आरिफ शेख यांनी केली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामदास गवळी यांनी केले. मिसाळ सर यांनी आभार व्यक्त केले.



नगर तालुकास्तरीय विज्ञान गणित व पर्यावरण प्रदर्शनात यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करताना मुख्याध्यापक डॉ.रामिन हुसेन व शिक्षक.

# तालुकास्तरीय विज्ञान, गणित प्रदर्शनात वर्का स्कूलचे यश

नगर – ५२ वे नगर तालुकास्तरीय विज्ञान, गणित व पर्यावरण प्रदर्शन नुकतेच पार पडले. यामध्ये अरणगाव येथील वर्का स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या प्राथमिक आणि माध्यमिक वर्गातील विद्यार्थ्यांनी यशस्वी सहभाग नोंदविला.

विज्ञान प्रदर्शनामध्ये हर्षवर्धन बळे या विद्यार्थ्याला द्वितीय क्रमांक प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह मिळाले. त्याला अश्विनी गुंजाळ यांचे मार्गदर्शन लाभले. गणित प्रदर्शनामध्ये नक्ष विटकर या विद्यार्थ्याला उत्तेजनार्थ प्रशस्तीपत्र व सन्मान पत्र मिळाले. त्याला वैशाली बेलसरे यांनी मार्गदर्शन केले. तसेच श्लोक जासूद, दीपिका सारण, खुशबू पात्रा, इच्छा चव्हाण यांनी सहभाग नोंदवला.

या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक डॉ.रामिन हुसेन, उपमुख्याध्यापिका शबनम मॅडम, अनिल शिंदे, निकिता बोर्डे यांचे मार्गदर्शन मिळाले. या यशस्वी विद्यार्थ्यांचा कॉलेजच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# नगरच्या अथर्व वाळके याने अमेरिकेत मिळवली कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजीची पदवी



नगर – शहरातील अथर्व वाळके याने अमेरिका येथील ए.एस.यू. विद्यापीठात कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजीची पदवी मिळवली. त्याचा विद्यापिठाच्या वतीने गौरवपूर्ण सन्मान करण्यात आला.

अथर्व वाळके हे टांगे गल्ली येथील सतीश विष्णुपंत वाळके यांचे चिरंजीव आहेत. त्यांनी भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलला शिक्षण घेऊन कन्स्ट्रक्शन विषयात भारती विद्यापिठात डिप्लोमा तर पुणे येथील अनंतराव पवार महाविद्यालयात डिग्री घेतली होती. त्यानंतर अमेरिका येथील ए.एस.यू. विद्यापिठात दोन वर्षाच्या कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नोलॉजीची पदवीसाठी प्रवेश मिळवला होता. नुकतेच त्यांनी यशस्वीरित्या पदवी मिळवली असून, त्याची अमेरिकेतील एका नामांकित कंपनीमध्ये निवड देखील झाली आहे.

# 'चित्रकूट गुरूकुल प्री स्कूल'मधील २ विद्यार्थ्यांची विश्वविक्रमी कामगिरी



'चित्रकूट'च्या विद्यार्थिनीचा सन्मान करताना सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या संस्थापिका जागृती ओबेरॉय आदी.

नगर – नगर-मधील सावेडीतील चित्रकूट गुरुकुल प्री स्कूलमधील दोन विद्यार्थ्यांनी जागतिक विक्रमाची नोंद केली आहे. इयत्ता पहिलीतील विद्यार्थी आर्या विजय गाडे हिने सामान्यज्ञानाच्या ५१ प्रश्नांची कवितेतून अचूक उत्तरे देत विक्रम केला तर एलकेजी मधील अवंतिका विशाल चव्हाण हिने अवघ्या २ मिनिटे ४५ सेकंदात १६ नर्सरी कविता एकापाठोपाठ एक सादर करून विश्वविक्रम केला. या कामगिरीबद्दल दोघींचाही एका विशेष कार्यक्रमात सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनच्या संस्थापिका तथा लोकसेवा ग्रुप ऑफ हॉटेलच्या संचालिका जागृती ओबेरॉय यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेचे संचालक संजय चव्हाण, प्राचार्या सारिका आनंद आदी उपस्थित होते.

प्राचार्या सारिका आनंद यांनी सांगितले की, यापूर्वी चित्रकूट गुरूकुलमधील विद्यार्थीनी हर्षिता हंगे हिने १५ नर्सरी कविता फक्त तीन मिनिटांत एकापाठोपाठ एक म्हणत विश्व विक्रम केला होता. आता आर्या गाडे आणि अवंतिका चव्हाण या दोघींनी विश्व विक्रम करून गुरूकुलचा नावलौकिक वाढवला आहे. विद्यार्थ्यांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देत त्यांना फुलाप्रमाणे फुलण्यासाठी शाळा कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

जागृती ओबेरॉय म्हणाल्या, अतिशय कमी वयात मुलांना अभ्यासाची गोडी लावून त्यांच्यातील सुप्त गुणांना चालना देण्याचं काम चित्रकूट गुरूकुल मध्ये सुरू आहे. चिमुरड्यांच्या भावी आयुष्याचा भक्कम पाया येथे रचला जातो. विश्व विक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांमुळे शाळेसह अहिल्यानगर शहराचाही लौकिक वाढत आहे. यासाठी प्राचार्या सारिका आनंद व त्यांच्या स्टाफचे कौतुक करावे तितके थोडेच आहे.

पालकांनीही शाळेच्या उपक्रमांना प्रतिसाद देत मुलांना योग्य प्रोत्साहन दिल्याने हे यश साजरे करता आल्याचे त्यांनी म्हटले.

# कॅलिडोस्कोप

## ३१ डिसेंबरपर्यंत आजारी रजा नाही




सोशल मीडियावर एक पोस्ट मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली. व्हायरल झालेल्या या पोस्टमध्ये कार्यालयाचे नियम स्पष्ट करण्यात आले. ३१ डिसेंबरपर्यंत कर्मचाऱ्यांना सुटी मिळणार नसल्याचेही सांगण्यात आले. कंपनीच्या या ऑर्डरची सोशल मीडियावर जोरदार चर्चा झाली. याशिवाय कर्मचाऱ्यांना आजारी रजाही मिळणार नाही, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. याचा सरळ अर्थ असा की, कर्मचारी आजारी असला तरी त्याला कार्यालयात यावे लागेल.

या आदेशाच्या प्रतीमध्ये २५ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबरपर्यंत कोणत्याही कर्मचाऱ्याला सुटी मिळणार नाही, असे लिहिले होते. याशिवाय कंपनीने आजारी रजेवर बंदी घातली आहे. यावर कंपनीचा युक्तिवाद असा आहे, की हा कालावधी सर्वात व्यस्त काळ आहे. भरपूर काम आहे, त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहणे खूप महत्वाचे आहे. त्यामुळे आम्ही सर्व प्रकारच्या सुट्ट्यांवर बंदी घातली आहे. या व्हायरल पोस्टमध्ये कंपनीचे नाव समोर आले नसले, तरी ही कंपनी आपल्या तुघलगी फर्मानांमुळे सतत चर्चेत असते. नुकतेच पुण्यातील एका कंपनीत काम करणाऱ्या तरुणीचा मृत्यू झाला होता. त्याचे कारण विषारी कार्यसंस्कृती मानले जात होते. यानंतर बाजार नियामक 'सेबी'च्या कर्मचाऱ्यांनीही विषारी कार्यसंस्कृतीची तक्रार केली. अर्थ मंत्रालयाला लिहिलेल्या पत्रात असे म्हटले आहे, की 'सेबी'चे नेतृत्व विषारी कार्य संस्कृतीला प्रोत्साहन देत आहे.



## भिकाऱ्याने दिली पाच कोटींची मेजवानी!

पाकिस्तानातून एका मेजवानीत मिठाई, शेवया, बिर्याणी, पुलाव, कोरमा आणि काय काय नाही अशी धक्कादायक घटना समोर आली आहे. या मेजवानीला सुमारे २० हजार लोक उपस्थित होते. या घटनेतील आश्चर्यकारक बाब म्हणजे ज्या कुटुंबाने या मेजवानीचे आयोजन केले होते, ते कुटुंब व्यवसायाने भिकारी असून भीक मागून आपला उदरनिर्वाह चालवते. राजकीय आणि आर्थिक अस्थिरतेमुळे अनेकदा टीकेला सामोरे जाणाऱ्या पाकिस्तानलाही 'भिकारी देश' या लेबलचा फटका बसला आहे; मात्र एक अनोखी आणि धक्कादायक बाब म्हणजे देशातील व्यावसायिक भिकारीही प्रचंड संपत्तीचे मालक आहेत आणि कधी कधी समाजातील त्यांच्या 'भिकारी' या ओळखीच्या वर उठून लोकांना धक्का बसेल अशी कामे करतात. एका रिपोर्टनुसार, हा कार्यक्रम गुजरनवाला येथील राहवली रेल्वे स्टेशनजवळ झाला. पंजाबच्या विविध भागातून हजारो लोक यात सहभागी झाले होते. भिकारी कुटुंबाने या मेजवानीवर सुमारे पाच कोटी पाकिस्तानी रुपये खर्च केले, जे सुमारे १.२५ कोटी भारतीय रुपयांच्या समतुल्य आहे. ही बातमी पाकिस्तानातील एका कुटुंबाची आहे, जी भीक मागून जगते;पण आपल्या मेहनतीने आणि प्रामाणिकपणाने त्यांनी इतकी प्रगती केली, की त्यांनी त्यांच्या आजीच्या चाळीसाव्या (चाळीसाव्या दिवसाच्या प्रार्थनेच्या दिवशी) २०,००० लोकांना जेवण दिले. परिस्थिती कशीही असो, मेहनत आणि चांगल्या हेतूने कोणतेही ध्येय गाठता येते, हे या कुटुंबाने दाखवून दिले.

## एका केळीची किंमत ५२ कोटी!


केळी खाण्यासाठी जास्त पैसे खर्च करावे लागत नाहीत. बाजारात केळी ४० ते ७० रुपये डझनने विकली जात आहेत; पण एका सामान्य केळीची किंमत ५२ कोटी रुपये असू शकते? होय, न्यूयॉर्कमध्ये एका लिलावादरम्यान एक केळी ५२ कोटी रुपयांना विकली गेली!

भिंतीवर टेप केलेल्या केळीच्या वैचारिक कलाकृतीला न्यूयॉर्कच्या लिलावात तब्बल ६.२ दशलक्ष डॉलर्स मिळाले. त्यात प्रसिद्ध क्रिप्टोकरन्सी व्यावसायिकाकडून सर्वाधिक बोली लागली. 'कॉमेडियन' आणि इटालियन कलाकार Maurizio Cattelan यांनी तयार केलेल्या, केळीच्या या कलाकृतीने २०१९ मध्ये आर्ट बासेल मियामी बीचवर पदार्पण केले, तेव्हा जगाचे लक्ष वेधून घेतले. चांदीच्या डक्ट टेपसह पांढऱ्या भिंतीवर सुरक्षित केलेली एकटी पिवळी केळी ही एक युक्ती आहे की कलाविश्वाची खरी उत्कृष्ट नमुना आहे यावर पाहुणे वाद घालत राहिले. त्यामुळे भाव वाढले. बोली आठ लाख डॉलरपासून सुरू झाली; परंतु काही मिनिटांतच ती ४० लाख डॉलरपर्यंत गेली.


लिलावकर्ता ऑलिव्हर बार्कर म्हणाला, की खरेदीदार अतिरिक्त १ दशलक्ष डॉलर्स देईल. अंतिम हॅमरची किंमत ५.२ दशलक्ष डॉलर झाली, त्यानंतर एका व्यावसायिकाने ही केळी ५०२ दशलक्ष डॉलरमध्ये विकत घेतली.

असे असतानाही लिलावाचे पैसेही व्यापारी १० लाख रुपयांच्या खोलीत भरणार आहेत. त्यानुसार या केळीची किंमत ६.२ दशलक्ष रुपये आहे जी भारतीय बाजारपेठेत ५२ कोटी रुपयांच्या समतुल्य आहे. ही बातमी सोशल मीडियावर पसरताच लोकांमध्ये खळबळ उडाली आणि ५२ कोटी रुपये किमतीच्या केळीमध्ये विशेष काय आहे याची उत्सुकता निर्माण झाली. सोशल मीडिया यूजर्सनी केळी विकत घेतलेल्या व्यक्तीबद्दल ही व्यक्ती एकतर खूप श्रीमंत आहे किंवा तो वेडा झाला आहे, अशा प्रतिक्रिया नोंदवल्या.





## झेंगडू शहरात सात सूर्य!



चीनच्या चेंगडू शहराच्या आकाशात अचानक सात सूर्य दिसायला लागले! हे अप्रतिम दृश्य पाहून तुमचा तुमच्या डोळ्यांवर विश्वास बसणार नाही. अनेक वेळा निसर्ग असे काही दाखवतो, जे केवळ निसर्गाच्या नियमांमुळेच शक्य होते. महान योद्धे निसर्गाचे शोषण पाहून आश्चर्यचकित आणि अस्वस्थ होतात. अशीच एक घटना चीनमधून समोर आली आहे, जिथे आकाशात असे दृश्य दिसले, की कल्पना करणेही अशक्य होते. चीनच्या आकाशात एकाच वेळी सात सूर्य दिसले आणि पाहणारे लोकही थक्क झाले. हे प्रकरण चीनच्या चेंगडू शहराचे आहे, जिथे आकाशात एकाच वेळी सात सूर्य दिसले, ही विलक्षण आणि अविश्वसनीय घटना तिथे उपस्थित असलेल्या लोकांनी आपल्या कॅमेऱ्यात कैद केली. १८ ऑगस्ट रोजी काढलेला हा व्हिडीओ काही वेळातच सोशल मीडियावर व्हायरल झाला. हे विलक्षण दृश्य आकाशात सुमारे एक मिनिट दिसले. 'डिम सन डेली एचके'ने दिलेल्या वृत्तानुसार, चेंगडू येथील एका स्थानिक व्यक्तीने हा व्हिडीओ आपल्या कॅमेऱ्यात कैद केला आहे. या व्यक्तीने सांगितले, की आकाशात हे दृश्य पाहून सर्वजण आश्चर्यचकित झाले आणि लोकांचे पाय जिथे होते तिथेच थांबले. ही घटना चीनमधील लोकांमध्ये चर्चेचा विषय बनली आहे. तज्ज्ञांचे असे मत आहे, की आकाशात सात सूर्य नाहीत किंवा ते कुठल्या जादूने आलेले नाहीत, उलट परावर्तनाचा परिणाम म्हणजे आकाशात असे दृश्य दिसले आहे. प्रकाशाच्या परावर्तनातील ऑप्टिकल भ्रमामुळे ही घटना घडली आहे. या घटनेचे मुख्य कारण म्हणजे प्रकाशाच्या अपवर्तनाची क्रिया आणि स्तरित काचेच्या परावर्तनामुळे होणारा सामान्य ऑप्टिकल भ्रम आहे.

## अन्नदानाचा विश्वविक्रम

तेलंगणाच्या गौतमकुमारने अनोखा विश्वविक्रम केला आहे. त्याने दिवसभरात एक हजारपेक्षा जास्त गरीबांना अन्नदान केलं. 'युनिव्हर्सल बुक ऑफ रेकॉर्ड्स'ने त्याच्या या कामगिरीची दखल घेतली आहे. या संस्थेतर्फे गौतमचा सन्मानही करण्यात आला. हैदराबादमध्ये रहाणाऱ्या गौतमकुमारची स्वत:ची एनजीओ आहे. या एनजीओच्या माध्यमातून तो सामाजिक कार्य करतो. २०१४ मध्ये त्याने ही एनजीओ सुरू केली. सर्व नीडी असं त्याच्या संस्थेचं नाव असून कोणालाही उपाशी झोपावं लागू नये, हा या संस्था स्थापनेमागचा उद्देश आहे. जास्तीतजास्त लोकांना अन्नदान करण्याचा संकल्प त्याने सोडला आहे. त्याच्या संस्थेचे १४० कार्यकर्ते यासाठी झटत असतात. गौतमकुमारने हैदराबादमधल्या तीन वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन गरजूंना भोजन दिलं. आधी तो गांधी हॉस्पिटलमध्ये गेला. तिथल्या गरीब रुग्णांना खायला दिलं. मग राजेंद्र नगरमध्ये जाऊन अन्नदान केलं आणि शेवटी अम्मा नन्ना अनाथालयात तो गेला. हा विक्रम केल्यानंतर 'युनिव्हर्सल बुक ऑफ रेकॉर्ड्स'ने त्याला प्रमाणपत्र दिलं.



## मिठाच्या खाणींमधला स्पा



बेलारूसमध्ये वैद्यकीय पर्यटनाचं प्रमाण बरंच जास्त आहे. इथे मिठाच्या खाणींचं रुपांतर स्पामध्ये करण्यात आलं आहे. हे अनोखे स्पा लोकांच्या आकर्षणाचं केंद्र ठरत आहेत. जमिनीपासून ४०० मीटर खोल हे स्पा आहेत. या स्पामध्ये उपचार करून घेण्यासाठी दरवर्षी काही हजार पर्यटक बेलारूसला येतात. बेलारूसमधल्या खाणी तसंच बोगद्यांमध्ये मीठ आणि पोटॅशियम मोठ्या प्रमाणावर आढळतं. याचा उपयोग विविध विकारांवरच्या उपचारांसाठी केला जातो. इथे येणाऱ्या लोकांना मन:शांती तर मिळतेच शिवाय अस्थमा, ॲलर्जी आणि श्वसनाचे विकारही दूर होतात. राजधानी मिन्स्कपासून १३० किलोमीटर अंतरावर १९९१ मध्ये पहिलं नॅशनल स्पीलिओथेरेपी क्लिनिक सुरू झालं. या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांमध्ये रशियन लोकांची संख्या अधिक असते. इथे टीव्ही, इंटरनेटसारख्या सोयी नाहीत पण विविध प्रकारचे व्यायाम करता येतात. काही काळ निवांतपणे घालवता येतो. मीठाच्या खाणींमधल्या स्पामध्ये २ ते ३ दिवस रहाता येतं. दोन आठवडे रहाण्यासाठी एक हजार डॉलर म्हणजे ७० हजार रुपये इतका खर्च आहे. एक वेगळा अनुभव म्हणून इथे जायला काहीच हरकत नाही.



## मधमाशा झाल्या गायब

जागतिक तापमान वाढ, कमी होत जाणारे अधिवास यामुळे प्राणी, पक्षी, किटक यांची संख्या कमी होत चालली आहे. प्राणी-पक्ष्यांच्या अनेक प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. याचा जीवसृष्टीवर विपरित परिणाम होऊ शकतो. इंग्लंडच्या पूर्व भागात मधमाश्यांच्या १७ प्रजाती नष्ट झाल्याचं अधिकृतरित्या जाहीर करण्यात आलं आहे. यात ग्रेट येलो बंबल बी आणि पॉटर फ्लॉवर बी सारख्या दुर्मिळ प्रजातीच्या मधमाश्यांचा समावेश आहे. वर्ल्ड वाईड फंड फॉर नेचर च्या अहवालात ही बाब नमूद करण्यात आली आहे. या घटनेकडे दुर्लक्ष करून चालण्यासारखं नाही. ही धोक्याची घंटा असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेत मधमाश्यांचं मोठं योगदान आहे. मधमाश्यांच्या कमी संख्येमुळे शेतकऱ्यांपासून ग्राहकांपर्यंत प्रत्येकाला त्रास होणार आहे. ब्रिटनमधल्या सफरचंदाच्या शेतीसाठी मधमाश्यांची गरज असते.

या मधमाश्या विविध माध्यमातून ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेत भारतीय चलनात सहा हजार कोटी रुपयांचं योगदान देत होत्या. मात्र आता इथली शेती, मधुमक्षिका पालन, फळांची लावगड यावर परिणाम होणार आहे. या प्रश्नाकडे गांभीर्याने बघण्याची गरज सर्वच स्तरातून व्यक्त होते आहे.

## वाजतच नाहीत बारा



बाराचा टोला पडला की चांगलीच धावपळ सुरू होते. मध्यान्ह सुरू झाल्याची ही वर्दी असते. रात्रीच्या बाराच्या टोल्याला सर्व जण झोपायची तयारी करू लागतात. घड्याळात नेमाने दोन वेळा बाराचे टोले पडतात. पण एखाद्या घड्याळ्यात बारा वाजतच नसतील तर? जगात असं एक घड्याळ आहे. स्वीत्झर्लंडच्या सोलोथर्न शहरात हे विचित्र घड्याळ आहे. या शहरातल्या टाउन स्क्वेअरमध्ये हे घड्याळ पहायला मिळतं. गंमत म्हणजे या घड्याळात फक्त ११ आकडे आहेत. १२ हा आकडाच नाही. १२ न वाजणारी बरीच घड्याळं इथे आहेत. यामागचं कारण मजेशीर आहे. इथल्या लोकांना ११ हा आकडा खूप आवडतो. त्यांच्यादृष्टीने हा आकडा शुभ मानला जातो. या शहरातल्या अनेक वस्तूंची रचना अकरा आकड्याप्रमाणे केल्याचंही पहायला मिळतं. या शहरातल्या चर्च आणि चॅपलची संख्या ११ आहे. इथलं सेंट उसूर्स हे प्रमुख चर्च ११ वर्षांत बांधून तयार झालं होतं. या चर्चला ११ दरवाजे आहेत तसंच ११ घंटा बांधण्यात आल्या आहेत. इथले लोक अकरावा वाढदिवस मोठ्या जल्लोषात साजरा करतात. याबाबतच्या काही आख्यायिका इथे प्रसिद्ध आहेत.

## वराशिवाय होतं लग्न

लग्नात वराला म्हणजे नवऱ्या मुलाला प्रचंड महत्त्व असतं. त्याची सरबराई केली जाते. प्रत्येक इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न होतो. वधू पक्षाकडचे तर वराच्या दिमतीला हजर असतात. वरातीत नवरा मुलगा घोड्यावर बसून मिरवत असतो. त्याच्या खाण्यापिण्याची पूर्ण व्यवस्था केलेली असते. मात्र आपल्या देशात लग्नाच्या विविध पद्धती असतात. प्रथा, परंपरा आणि विधी असतात. प्रत्येक जात, धर्मानुसार लग्नविधींमध्ये वैविध्य आढळतं. काही लग्नांमध्ये महिला वरातीत जात नाहीत. मात्र एका समाजातल्या लग्नात नवरा मुलगा वरातीत नसतो. राजस्थानातल्या छोटा उदयपूर भागातल्या आदिवासी समाजात अशी परंपरा आहे. लग्नात नवऱ्या मुलाऐवजी त्याची अविवाहित बहिण किंवा कुटुंबातली अविवाहित महिला सहभागी होते. नवरा मुलगा आईसोबत घरीच थांबतो. या प्रथेबद्दल ऐकून कोणालाही आश्चर्य वाटेल. वरातीत वराची बहिणच सहभागी होते. गंमत म्हणजे लग्नाचे सगळे विधी तिच पार पाडते. सप्तपदीचा विधीही ही बहिणच पार पाडते. इथल्या तीन गावांमध्ये अशी परंपरा आहे. ही प्रथा मोडली तर वाईट गोष्टी घडतील या भीतीने कोणीही ही पद्धत मोडायला धजावत नाही. नवऱ्याशिवाय संपन्न होणारं लग्न म्हणजे विचित्रच प्रकार म्हणायला हवा.



## एव्हरेस्टचे कलंदर

जगातलं सर्वात उंच एव्हरेस्ट शिखर सर करण्याची चढाओढ सध्या पहायला मिळते आहे. एव्हरेस्टच्या मार्गावर गिर्यारोहकांची मोठी गर्दी झाली आहे. इथे ट्रॅफिक जॅमसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. एव्हरेस्टची चढाई खूप कठीण असते. मात्र शेर्पा कामी रिता यांनी २४ वेळा हे शिखर सर केलं आहे. अशी कामगिरी करणारे ते जगातले पहिलेच व्यक्ती आहेत. वयाच्या बाराव्या वर्षापासून कामी रिता एव्हरेस्टच्या बेस कॅंपपर्यंत गिर्यारोहकांच्या गरजेचं सामान पोहोचवण्याचं काम करतात. जवळपास ११ वर्ष त्यांनी हे काम केलं.

१९९२ मध्ये त्यांना पहिल्यांदा एव्हरेस्ट चढण्याची संधी मिळाली. ही चढाई करण्याआधी त्यांनी एव्हरेस्टच्या वातावरणाची पूर्ण माहिती घेतली. १९९४ मध्ये कामी पहिल्यांदा एव्हरेस्टच्या कॅंप ४ पर्यंत म्हणजे २५,९३८ फूट उंचीवर पोहोचले. त्यानंतर त्यांनी नियमितपणे अशी चढाई सुरू केली. एका वर्षात दोन वेळाही ते एव्हरेस्ट चढले आहेत. शेरपा म्हणून जगातल्या सात खंडांमधल्या सात शिखरांवर चढण्याचा विक्रमही कामी रिता यांच्या नावे आहे. नेपाळमधल्या थेमू गावात कामी रिताचा जन्म झाला. वडिलांना एव्हरेस्ट चढण्याची खूप इच्छा होती. मात्र काही कारणांमुळे हे शक्य झालं नाही.

आता कामी आपल्या वडिलांची ही इच्छा पूर्ण करत आहेत. कामीचे मोठे भाऊ लाकपा रिताही १७ वेळा एव्हरेस्ट चढले आहेत. आपण अजून तंदुरूस्त असून साठीपर्यंत एव्हरेस्ट सर करत रहाणार असल्याचं कामी रिता सांगतात. त्यांच्या या उत्साहाला सलाम केला पाहिजे.



# तोंडाचे संभाव्य घातक विकार (PMDs) : आढावा

संभाव्य घातक विकार (PMDs) तोंडाच्या स्क्वॅमस सेल कार्सिनोमा( कर्करोग) रूपांतरित होण्याचा धोका वाढवणाऱ्या स्थितींच्या गटाचा संदर्भ देतात. सामान्य उदाहरणांमध्ये ल्युकोप्लाकिया, (पांढरा चट्टा) एरिथ्रोप्लाकिया (लाल चट्टा) ओरल सबम्यूकस फायब्रोसिस, (तोंड उघडण्याची असमर्थता) लाइकेन प्लॅनस आणि ॲक्टिनिक चेइलायटिस (दीर्घकालीन सूर्यप्रकाशामुळे ओठांवर होणारा परिणाम, कोरडेपणा, खवड, चुंडावर रंगाचे बदल) यांचा समावेश आहे. पीएमडी ची कारणे विविध आहेत

ज्यामध्ये तंबाखू (धूम्रपान केलेले आणि धूररहित), अल्कोहोल सेवन, सुपारीचा वापर, दीर्घकालीन आघात आणि मानवी पॅपिलोमाव्हायरस (HPV) सारखे विषाणूजन्य संसर्ग यांचा समावेश आहे. अनुवांशिक पूर्वस्थिती आणि आहारातील कमतरता, विशेषतः जीवनसत्त्वे A, C आणि E, देखील रोगजननात योगदान देतात. ॲक्टिनिक चेइलायटिसमध्ये अतिनील किरणोत्सर्ग यासारखे पर्यावरणीय घटक पुढे भूमिका बजावतात.

### सामान्य लक्षणे

मुखीय पोकळीत पीएमडी बहुतेकदा पांढरे, लाल किंवा मिश्रित जखम म्हणून उपस्थित असतात, ज्यामध्ये ल्युकोप्लाकिया सर्वात सामान्य आहे. ल्युकोप्लाकिया हा एक सततचा पांढरा ठिपका म्हणून दिसून येतो जो काढून टाकता येत नाही, तर एरिथ्रोप्लाकिया हा मखमली लाल ठिपका म्हणून दिसून येतो ज्यामध्ये घातक परिवर्तन क्षमता जास्त असते. ओरल सबम्यूकस फायब्रोसिस हे तोंडाच्या श्लेष्मल त्वचेच्या फायब्रोसिसद्वारे दर्शविले जाते, ज्यामुळे तोंड उघडण्यास प्रतिबंध होतो आणि जळजळ होते. लाइकेन प्लॅनस द्विपक्षीय पांढरे ठिपके (विकॅम स्ट्राय) म्हणून दिसून येते, तर ॲनक्टिनिक चेइलायटिस ओठांवर खडबडीत, खवलेयुक्त ठिपके म्हणून दिसून येते. पीएमडीचे सुरुवातीचे टप्पे बहुतेकदा लक्षणे नसलेले असतात, जे लवकर निदानासाठी नियमित तोंडी तपासणीचे महत्त्व अधोरेखित करतात.

### उपचार

पीएमडीच्या व्यवस्थापनात तंबाखू आणि अल्कोहोल वापर बंद करणे यासारख्या कारक घटकांना दूर करणे गरजेचे आहे. औषधीय उपचारांमध्ये कॉर्टिकोस्टिरॉईड्स (लाइकेन प्लॅनससाठी) किंवा लाइकोपीन आणि बीटा–कॅरोटीन सारखे अँटीऑक्सिडंट्स समाविष्ट असू शकतात. सतत किंवा डिस्प्लास्टिक जखमांसाठी जखमा छाटणे, लेसर थेरपी किंवा क्रायोथेरपीसारखे शस्त्रक्रिया हस्तक्षेप हे पर्याय आहेत. घातकतेच्या कोणत्याही प्रगतीचे मूल्यांकन करण्यासाठी बायोप्सीसह नियमित निरीक्षण करणे महत्वाचे आहे. उच्च–जोखीम असलेल्या जखमांमध्ये लवकर हस्तक्षेप केल्याने घातक रूपांतरणाची शक्यता लक्षणीयरीत्या कमी होऊ शकते.

### प्रतिबंध

प्रतिबंधात्मक धोरणे सुधारित जोखीम घटकांना संबोधित करण्यावर लक्ष केंद्रित करतात, ज्यामध्ये तंबाखू आणि सुपारीचा वापर कमी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य उपक्रमांचा समावेश आहे आणि अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध निरोगी आहारांना प्रोत्साहन दिले जाते. नियमित तोंडाच्या कर्करोगाची तपासणी, विशेषतः उच्च जोखीम असलेल्या लोकसंख्येसाठी, अत्यंत महत्त्वाची आहे. रुग्णांना पीएमडीच्या जोखमींबद्दल शिक्षित करणे, सूर्य संरक्षण (उदा. ॲक्टिनिक चेइलायटिससाठी एसपीएफ असलेले लिप बाम) प्रोत्साहन देणे आणि नियमित दंत तपासणीला प्रोत्साहन देणे यामुळे लवकर ओळखण्यास आणि प्रतिबंध करण्यास मदत होते. तोंडाच्या घातक आजारांचा जागतिक भार कमी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य धोरणांमध्ये या उपायांचे एकत्रीकरण आवश्यक आहे.

– डॉ. सौ. अर्चना सिंघ तांबोळी
FCIO MXILRY व कॅन्सर तज्ञ ९३२६०६६८३६

# नामस्मरण हे भक्तिमार्गाचे मुख्य साधन

## रिंगणे देवा यांचे प्रतिपादन; शिलाविहारला गोंदवलेकर महाराजांची पुण्यतिथी साजरी


शिलाविहार येथे श्री. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी महाआरती करताना सुंदरदास रिंगणे, अशोक मुळे, सौ. रेखाताई रिंगणे (छाया – विजय मते)

नगर – परमार्थात नुसती ध्यानधारणा पुरेशी नसते. ध्यानाने मनुष्य अलिप्त होतो. त्यामुळे स्वभाव कठोर बनतो. नाम साधना केली की मनुष्य प्रेमळ बनतो. ध्यानधारणा बरोबरच थोड्यावेळ नामस्मरण करीत जा. नामस्मरणाने भगवंताचे प्रेम उत्पन्न होते. नाम हे निष्ठेने, आनंदाने घ्या. नामस्मरण हे भक्तिमार्गाचे मुख्य साधन आहे, असे विवेचन ह.भ.प. सुंदरदास रिंगणे देवा यांनी केले.

सावेडी उपनगरात शिलाविहार येथे श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी श्रींच्या मूर्तीस पहाटे रुद्राभिषेक करण्यात आला. ५ वाजून ५५ मिनिटांनी फुले अर्पण करून रघुपति राघव राजाराम पतित पावन सिताराम नाम घोष करीत, आरती होवुन पुण्यतिथि साजरी करण्यात आली.

श्री. रिंगणे देवा यांनी महाराजांच्या चरित्र ग्रंथातील नामाचे महत्त्व विषद केले. ते म्हणाले, आपली वृत्ती आणि भगवंत यांना जोडणारी साखळी म्हणजे भगवंताचे नाम आहे. त्यामुळे आपली वृत्ती नामामध्ये गुंतवून ठेवावी नाम घेतल्याने श्रद्धा दृढ होते. अखंड नामस्मरण हेच भगवंत प्राप्तीचे साधन आहे. यावेळी ह.भ.प. सखाराम पंडित यांनी देखील गोंदवलकर महाराज यांच्या चरित्र ग्रंथ यामधील आढावा घेऊन मनुष्याच्या जीवनात असणारे प्रारब्ध, कर्माचे फळ, सुखदुःख का भोगावे लागतात यावर उदाहरणाचे दाखले देत ते भोगत असताना नामाचे अनुष्ठान ठेवावे. तसेच नामाचे महत्व या विषयावर प्रवचन केले.

दुपारी भजनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला. महाआरती, महाप्रसादाने एक दिवसाचे पुण्यतिथी उत्सवाची सांगता करण्यात आली. यावेळी हभप सुंदरदास रिंगणे, सौ.रेखाताईं रिंगणे, प्रसाद देवा, अशोक मुळे, ब्रह्मचैतन्य सेवाभावी मंडळाचे सदस्यांनी परिश्रम घेतले.

# ३१ डिसेंबरला ‘दारूच्या बाटल्या रित्या करण्याऐवजी रक्ताच्या पिशव्या भरुया’

नगर – रुग्णांची वाढती गरज लक्षात घेऊन सालाबादाप्रमाणे या वर्षीही ३१ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत जाणीव फाउंडेशन व ज़िल्हा रुग्णालय रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने ‘दारूच्या बाटल्या रित्या करण्याऐवजी रक्ताच्या पिशव्या भरुया’ या धर्तीवर, रक्तदान शिबिराचे आयोजन शंभुराजे चौक, प्रगती डेअरीसमोर, श्रीराम चौकाजवळ, सावेडी, अहमदनगर येथे करण्यात आले आहे.

२०२४ या सरत्या वर्षात एक अधिकचे पुण्यकर्म आपल्या खात्यात जमा करण्याची सुवर्णसंधी समजून जास्तीत जास्त युवकांनी सदर शिबिरात रक्तदान करून गरीब व गरजू रुग्णांना मदत करावी व इतरांनाही त्यासाठी प्रोत्साहित करावे. रक्तदान हे जीवनदान असते.

विशेष म्हणजे सर्व रक्तदात्यांना आकर्षक जीवनोपयोगी वस्तू भेट दिली जाणार आहे. इच्छुक रक्तदात्यांनी नेहमीप्रमाणे रक्तदान करून या पुण्यकर्मात सहभागी होऊन रुग्णसेवा करण्याच्या अनोख्या सन्धीचा लाभ घ्यावा. आम्ही सर्वजण वर्षातून किमान ३ वेळा तरी मोठ्या आनंदाने रक्तदान करतो. या पुण्यशील उपक्रमासाठी सर्वांनी रक्तदान करून आपले अमूल्य योगदान द्यावे, असे आवाहन जाणीव फाउंडेशनच्यावतीने छायाचित्रकार राहुल जोशी, ॲड. विक्रम वाडेकर, बांधकाम व्यावसायिक प्रदीप वाखुरे, इंजिनीअर बाळासाहेब पवार, बांधकाम व्यावसायिक शंतनु पांडव, विमा सल्लागार राहुल काळे, कर सल्लागार विकास जोशी, सुवर्णकार महेंद्र नांदुरकर, प्रगतीशील शेतकरी शिवशर्मा चेमटे, बांधकाम व्यावसायिक सचिन निक्रड, सन्दिप रोडे, सुभाष बांगर, दीपक भंडारी, सतिश शिन्दे, विकास गायकवाड, अतुल इथापे, आशिष वेळापुरे, संजय माने, कैलाश गाडे, गणेश कानवडे, अजय पवार, सतीश इंगळे व इंजिनीअर तथा ॲड. कैलाश दिघे यांनी केले आहे.

# जिल्ह्याला गायन कलेची मोठी परंपरा

## ज्ञानदेव पांडुळे यांचे प्रतिपादन; रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागात रंगली विद्यार्थ्यांची गायन स्पर्धा


रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागात विद्यार्थ्यांची गायन स्पर्धा उत्साहात पार पडली.

नगर – नगर जिल्ह्याला गायन कलेची मोठी परंपरा आहे. सामाजिक प्रबोधनासह मनोरंजनाचे कार्य गायक करत आहे. अनेक दिग्गज कलावंत या मातीतून घडले असून, भविष्यातील कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांसाठी गायन स्पर्धा घेतली जात असल्याची भावना रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे यांनी व्यक्त केली.

कर्मवीर विद्या प्रबोधिनी व रयत शिक्षण संस्था उत्तर विभागच्या वतीने आयोजित गायन स्पर्धेच्या उद्घाटनाप्रसंगी पांडुळे बोलत होते. याप्रसंगी रयत शिक्षण संस्था उत्तर विभागाचे सहाय्यक विभागीय अधिकारी प्रमोद तोरणे, बाबासाहेब नाईकवाडी, गुणवत्ता कक्ष प्रमुख काकासाहेब वाळुंजकर, बोडखे, विभाग प्रमुख राजनारायण पांडुळे उपस्थित होते.

पुढे पांडुळे म्हणाले की, पंडित नगरकर यांची भूपाळी आज ही गाजत आहे. हा वारसा पवन नाईक व खरवंडीकर पुढे चालवत आहे. विद्यार्थी घडावेत त्यांना कला क्षेत्रात संधी मिळावी या एकमेव उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन केले जाते. आज रयतचे विद्यार्थी असलेले कलाकार महाराष्ट्र गाजवत आहे. वेगवेगळ्या मालिकेत त्यांना संधी मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

उपस्थित पाहुण्यांनी स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करुन भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. बुरुडगाव रोड येथील रयत शिक्षण संस्था उत्तर विभागाच्या कार्यालयात ही स्पर्धा रंगली होती. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी भक्ती गीत, सांस्कृतिक गीत, कव्वाली, पोवाडे, शाहिरी गीत सादर केले. यामध्ये इयत्ता पहिली पासून ते इयत्ता बारावी पर्यंतचे युवक युवती सहभागी झाल्या होत्या. आपल्या उत्कृष्ट गायन शैलीने बालकलाकारांनी उपस्थितांची मने जिंकली.

स्पर्धेचे परीक्षण राजेंद्र बडे, अपर्णा रोहकले, विवेक गहाणडुले, संतोष सरसमकर यांनी केले.




नाताळ सणानिमित्त ह्यूम मेमोरियल चर्च येथे विविध धार्मिक कार्यक्रम झाले. यावेळी रेव्ह डॉ. सनी मिसाळ यांनी नाताळचा संदेश दिला. यावेळी समाजबांधव उपस्थित होते

# राजीव गांधी अपघात विमा योजनेतून जखमी शाळकरी विद्यार्थिनीला मिळाला उपचाराचा खर्च

नगर– महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी अपघात विमा योजनेतून अपघातातग्रस्त पात्र विद्यार्थ्यांच्या बचत खात्यात शिक्षणाधिकारी, योजना कार्यालय अहिल्यानगर यांच्याकडून मदतीची रक्कम जमा करण्यात आली असून पालकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले.


शालेय विद्यार्थ्यांचा अपघात झाल्यास, अवयव निकामी झाल्यास अथवा दुर्दैवाने विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्यास शासनाच्या राजीव गांधी अपघात विमा योजनेतून विद्यार्थी व पालकांना औषधोपचार, शस्त्रक्रिया व मदत म्हणून दिड लाखांपर्यंत अर्थसहाय्य केले जाते. नुकत्याच शिक्षणाधिकारी योजना कार्यालय अहिल्यानगर यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त विद्यार्थ्यांच्या खात्यात रक्कम वर्ग करण्यात आली.

नगर तालुक्यातील तुकाई मळा प्राथमिक शाळा (केंद्र–गुंडेगाव) येथील कु. अक्षरा अनिल भापकर या विद्यार्थीनीचा दि.१ ऑगस्ट २०२२ रोजी दुपारी शाळेत खेळताना अपघात झाला होता. तिच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती. तिच्या उपचारासाठी रुग्णालयात झालेल्या खर्चाची फाईल करून शाळेतील शिक्षक विजय कडूस यांनी या विद्यार्थिनीच्या उपचाराचा खर्च मिळावा म्हणून प्रस्ताव सादर केला होता. त्यास मंजुरी मिळून सदर योजनेचा नुकताच लाभ मिळाला. या कामी शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे, उपशिक्षणाधिकारी संजयकुमार सरवदे, विस्तार अधिकारी रविंद्र थोरात, गटशिक्षणाधिकारी नगर तालुका बाबुराव जाधव, विस्तार अधिकारी सौ. मंदा माने–जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली वरीष्ठ सहाय्यक सौ पल्लवी तुंगार, विषयतज्ञ सुधीर लांडगे, सौ. माया हराळ, संजय शेलार यांनी विशेष परिश्रम घेऊन विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य केले. शासनाच्या या योजनेबाबत गुंडेगाव व परिसरातील ग्रामस्थ, पालकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले.

## हॉटेलच्या पार्किंगमधून मोपेडची चोरी

नगर – नगर–मनमाड रोडवरील बंधन लॉन शेजारी असलेल्या नगरी व्हिलेज हॉटेलच्या पार्किंगमध्ये लॉक करून लावलेली सुझुकी कंपनीची ॲक्सेस १२५ मोपेड दुचाकी (क्र. एम एच १६ डी बी ७०६४) अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली आहे.

याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी सविता दत्तात्रय खैरे (वय ४२, रा. साई परिवार हाऊसिंग सोसायटी, वडगाव गुप्ता रोड अ.नगर) यांनी दिलेले फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (ब) अन्वये चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली अधिक तपास पोलीस हवालदार धोत्रे करीत आहे.


जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा शिंदे अँड सन्सचे संचालक सिताराम शिंदे व सतीश शिंदे यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# लहान वयात मुलांच्या भविष्याचा पाया रचला जातो

## डॉ. प्रशांत महांडुळे यांचे प्रतिपादन; लंडन किड्स शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात


लंडन किड्स शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.

नगर – लहान मुलांवर संस्कार रुजवून त्यांचे भविष्य घडवण्याचे कार्य शिक्षक करतात. लहान वयात मुलांच्या भविष्याचा पाया रचला जातो. आजची लहान मुले उद्याचे भविष्य घडवत आहे. त्यांच्यावर चांगले संस्कार झाल्यास सक्षम समाज घडणार आहे. मुले पालकांचे अनुकरण करतात. पालक मोबाईलपासून लांब राहिल्यास मुले देखील मोबाईलपासून लांब राहतील. आपल्या नावाने आई–वडिलांचा परिचय व्हावा, एवढे यश प्रत्येक विद्यार्थ्यांनी जीवनात नक्की मिळवावे. शाळेतील शिक्षकांडून ज्ञानदानाचे कार्य असेच चालू आहे. शाळा दिसताना छोटी असली तरी गुणवत्तेने शाळेचा नावलौकिक दूरवर पसरलेला असल्याचे डॉ. प्रशांत महांडुळे यांनी सांगितले.

शाहूनगर येथील ज्ञानसाधना एज्युकेशन फाउंडेशनची लंडन किड्स प्री स्कूल या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात पार पडले. चिमुकल्या मुलांनी रंगीबेरंगी पोशाख परिधान करून विविध गीतांवर आपली नृत्यकला सादर केली व उपस्थितांची मने जिंकली.

स्नेहसंमेलनाचे उद्घाटन डॉ. प्रशांत महांडुळे यांच्या हस्ते झाले. यावेळी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कमलेश भंडारी, मनपा स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर, उद्योजक संभाजी पवार, जालिंदर कोतकर, माजी नगरसेवक अमोल येवले, उद्योजक दत्ता जाधव, बच्चन कोतकर, अजित कोतकर, सुमित लोंढे, नगरसेवक प्रशांत गायकवाड, जयद्रथ खाकाळ, छबुराव कोतकर, गोरख कोतकर, अजित विधाटे, निलेश नाणेकर, महादेव हजारे, विकास खराडे, संस्थेचे अध्यक्ष दीपक तागडे, सचिव संदीप भोर, मुख्याध्यपिका रुचिता जमदाडे, शबाना शेख, शाहरुख शेख, संचालक प्रसाद जमदाडे आदीसह विद्यार्थी पालक उपस्थित होते. उपस्थितांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# सरस्वती मंदिर नाईट स्कूलमध्ये रंगले स्नेहसंमेलन; विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे सादरीकरण


सरस्वती मंदिर नाईट स्कूलचे स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडले.

नगर – दिवसभर कष्ट करणाऱ्या हातांना शिक्षण आणि संस्कार देणाऱ्या शहरातील नवविद्या प्रसारक मंडळाच्या सरस्वती मंदिर नाईट स्कूलचे स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडले. विविध कारणांनी अर्धवट शिक्षण सोडल्यानंतर नाईट स्कूलच्या माध्यमातून पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आलेल्या विद्यार्थ्यांनी स्नेहसंमेलनात सांस्कृतिक कार्यक्रमात धमाल केली. हिंदी–मराठी गाण्यावर रंगलेल्या नृत्याने सांस्कृतिक कार्यक्रमात रंग भरला होता.

वर्चस्व ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष सागर मुर्तडकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी सोमनाथ जाधव, नाईट स्कूलचे माजी विद्यार्थी तथा माजी नगरसेवक अनिल शेकटकर, संस्थेचे मानद सचिव निलेश वैकर, शाळेचे मुख्याध्यापक पांडुरंग गवळी, शाळा समितीचे अध्यक्ष विजय देवचके, मंगेश धर्माधिकारी आदींसह विविध शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, माजी विद्यार्थी संघाचे पदाधिकारी, सदस्य व नाईट स्कूलचे आजी–माजी विद्यार्थी उपस्थित होते.

अनिल शेकटकर म्हणाले की, संयम आणि गती ही यशाची दोन चाके आहेत. प्रामाणिक प्रयत्न केल्यास यश नक्की मिळते. नाईट स्कूलचा विद्यार्थी असल्याचा अभिमान आहे. नाईट शाळेत विद्यार्थी कष्ट करुन शिक्षण घेऊन भवितव्य घडवत असल्याचे त्यांनी सांगितले.

निलेश वैकर म्हणाले की, शिक्षणाचे महत्त्व पटलेले विद्यार्थी रात्र प्रशाळेत येतात. कष्ट करुन शिक्षण घेणाऱ्यांचे कौतुक वाटते. जीवनात फक्त हुशारी कामाला येत नाही, कष्ट, अनुभव याची सांगड घालून यश प्राप्त होते. कष्ट करून पुढे जाता येणार नाही, कष्टाला शिक्षणाची जोड द्यावी लागणार असल्याचे स्पष्ट करुन विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे त्यांनी कौतुक केले.

प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक पांडुरंग गवळी यांनी केले. उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते इयत्ता दहावी बोर्डाच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांसह विविध कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. परिचय देवका लबडे यांनी करून दिला. सूत्रसंचालन विलास शिंदे यांनी केले. आभार सुषमा धारूरकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वीणा कुऱ्हाडे, राजू भुजबळ, मासूम संस्थेचे स्कूल लीडर महेंद्र म्हसे यांनी परिश्रम घेतले.

